# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२६**

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

## अचलपूर व चांदूरबाजार समितींमध्ये येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी 'शेतकरी निवास' उभारणेबाबत

**(१) १२२९० (३०-०७-२०२५). श्री.प्रविण तायडे (अचलपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील अचलपूर व चांदूरबाजार कृषी उत्पन्न बाजार समितींमध्ये केवळ विदर्भातूनच नव्हे तर मध्यप्रदेशासारख्या सीमावर्ती राज्यांमधून शेतकरी शेतीमाल विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांसोबत अनेक वेळा महिला व लहान मुलं असतात, आणि त्यांना रात्रभर बाजारात थांबावे लागते, त्यांना ऊन, वारा, पाऊस यामध्ये उघड्यावर झोपावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाजार समितीमध्ये शेतकरी निवासगृह उभारणे आवश्यक आहे जेणेकरून शेतकऱ्यांना सुरक्षित व सन्मानजनक निवासाची सोय होईल,

(४) असल्यास, शेतकरी निवासगृह बांधणे व निधी व त्यासाठी उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (०२-०२-२०२६) :** (१) होय.

(२) नाही.

शेतकऱ्यांच्या शेतमाल मोजमापाकरिता विलंब झाल्यास संबंधित शेतकऱ्यांची जेवणाची व निवासाची व्यवस्था अचलपूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मंगल कार्यालयात केली जाते तसेच, कृषि उत्पन्न बाजार समिती चांदुर बाजार मध्ये शेतकऱ्यांची व्यवस्था बाजार समितीच्या आवारामध्ये करतात.

(३) व (४) कृषि उत्पन्न बाजार समिती, अचलपूरच्या आवारामध्ये असलेले शेतकरी भवन नादुरुस्त झाल्यामुळे ते निर्लेखीत करुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेअंतर्गत नविन शेतकरी भवन बांधणे बाबतचा प्रस्ताव बाजार समिती, अचलपूर यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांचेकडे सादर केलेला आहे. कृषि उत्पन्न बाजार समिती, चांदूर बाजार येथे नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०१.०७.२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सदर कामाची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून बांधकाम लकरच सुरु करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शालेय शिक्षण विभागात झालेला गैरव्यवहार

**(२) १२६२२ (०८-०९-२०२५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी मा. श्रीमती ललिता दहितूले यांच्या सहमतीने त्यांच्या कार्यालयातील अधिक्षक श्री. राऊत व लिपीक श्री. नितीन नगराळे हे आर. पी. मंगला हायस्कूल कोपरी ठाणे (पूर्व) या शाळेतील

लिपीका श्रीमती रुपाली थोरात यांच्यामार्फत विभागातील कामे नियमबाह्य पद्धतीने करत असून, अपेक्षित रक्कम् न मिळाल्यास लोकांची फाईल गहाळ करणे, फाईल मधील पाने फाडणे यांसारख्या लोकांना मानसिक त्रास देण्याच्या अनेक तक्रारी समोर आल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित कामे असलेली खाजगी शाळेतील लोकांना मानसिक दृष्ट्या हतबल केल्यानंतर लिपीक श्री. नितीन नगराळे हे श्री. महेश पवार आर.पी. मंगला हायस्कूल या खाजगी शाळेतील शिपाई यांना आदेश देऊन पुढील शासकीय कार्यवाहीसाठी आर. पी. मंगला हायस्कूलच्या लिपीका श्रीमती रुपाली थोरात यांच्याकडे पाठवितात हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शालेय शिक्षण विभागातील २० ते १०० टक्के अनुदानावर येणारे शाळेचे प्रस्तावाचे काम करणारे श्री. मुटके लिपीक पैशाची मागणी करतानाची तक्रारही अनेकदा प्राप्त झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्ह्यातील शिक्षण विभागात लिपीक श्री. नितीन नगराळे हे २४ वर्षांपासून श्री. मुटके लिपीक हे ०९ वर्षांपासून श्री. राऊत हे ०४ वर्षांपासून अधिक्षक असून संबंधितांचा ०३ वर्षांपासून अधिक कालावधी झाला असूनही एकाच ठिकाणी कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासकीय नोकरीत अधिकारी व कर्मचारी यांना दिर्घकाळ एकाच ठिकाणी ठेवू नये असा नियम असतानाही या व्यक्ती वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत आहेत. सदर विभागातील आर्थिक गैरव्यवहाराबाबत संबंधित आलेल्या घटनेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१३-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.ठाणे कार्यालयातील दिनांक २०/१०/२०२२ ते दिनांक ३१/०७/२०२५ या कालावधीमधील प्राप्त आवक व ई-टपालाचे अवलोकन केले असता, कार्यालयातील कार्यरत कनिष्ठ कर्मचारी यांच्याविरूध्द प्रश्नांमधील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने तक्रार प्राप्त नसल्याचे आढळुन आले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. ठाणे या कार्यालयामधील ज्या अधिकारी / कर्मचारी यांचा सेवा कालावधी हा ३ वर्षापेक्षा अधिकचा झालेला आहे, अशा संबंधित शिक्षणाधिकारी, अधिक्षक व वरिष्ठ लिपीक यांची जून, २०२५ या कालावधीत प्रशासकिय बदली करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कर्नाटकच्या हद्दीतील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३) १२७२६ (१९-०८-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटक सरकारने नव्याने भीमा नदीवर उमराणी (सादेपूर) येथे बांधलेल्या बॅरेजेस मधून अचानक पाणी सोडल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यातील (जि.सोलापूर) लवंगी, टाकळी, बरूर, कुरघोट, औंज (म), हत्तरसंग, कुडल, धारसंघ, शेगाव, हिळ्ळी, या भीमा नदीकाठच्या दहा गावांबरोबर कर्नाटकच्या हद्दीतील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या शेकडो विद्युत पंप (मोटारी) वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्नाटक सरकारने बांधलेल्या बंधाऱ्याच्या शेतकऱ्यांना फायदा होण्याऐवजी मोठ्या प्रमाणात

नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांकडून नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बंधाऱ्यावर पूर नियंत्रण यंत्रणा तात्काळ बसवून विद्युत पंप (मोटारी) वाहून गेलेल्या शेकडो शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-१२-२०२५) : (**१) हे अंशत: खरे आहे.

सादेपूर बॅरेजमधून पुराचे पाणी सोडण्यात आल्याने दक्षिण सोलापूर व कर्नाटक भीमा नदीकाठावरील विद्युत मोटारी बुडून नुकसान झाल्याची बाब दिनांक ०२/०६/२०२५ रोजी निदर्शनास आली आहे.
(२) हे खरे नाही.

नुकसान भरपाई मागणी संदर्भात अद्याप कोणतीही मागणी क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झाली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पारोळा (जि.जळगाव) तालुक्यातील मौजे चोरवड व परिसरातील शेतकऱ्यांसह नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी व सिंचनासाठी मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याबाबत**

**(४) १२७४७ (१९-०८-२०२५). श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारोळा (जि.जळगाव) तालुक्यातील मौजे चोरवड, टिटवी, महिंदळे व भोंडणदिगर ही गावे कायम स्वरूपी टंचाईग्रस्त असून पिण्याच्या पाण्याचा व शेती सिंचनाचा प्रश्न दरवर्षी उद्भवत असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चोरवड गावालगत सुमारे ६ कि.मी अंतरावर गिरणा कॅनलद्वारे पाणी उपलब्ध असून पाटाद्वारे ५० हेक्टर जमिन ओलीता खाली येत असून, उर्वरित परिसराला कॅनल नसल्याने या परिसरातील शेतकऱ्यांसह नागरिकांच्या पिण्याचा पाण्यासाठी व सिंचनासाठी मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील परिसरातील कायम स्वरूपी दुष्काळ हटविण्यासाठी गिरणा कॅनलद्वारे कॅनल देऊन चोरवड व परिसरातील पिण्याच्या पाण्याचा व शेती सिंचनाचा प्रश्न सोडविण्यासाठीचे निवेदन स्थानिक मा. जलसंपदा मंत्री यांना माहे मार्च, २०२५ मध्ये केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०४-२०२६) :** (१) हे, खरे नाही.

शिरसमणी लघु प्रकल्पातून पारोळा (जि. जळगांव) तालुक्यातील मौजे चोरवड या गावास शासन स्तरावरील ०.०९७ दलघमी व आकस्मिक आरक्षण ०.०५५ दलघमी पिण्याच्या पाण्याचे आरक्षण मंजुर आहे. तसेच चोरवड या गावास पारोळा शाखा कालव्याच्या B६ आणि B६' चारीद्वारे सिंचनसाठी पाण्याचा पुरवठा केला जातो. चोरवड गावाचे अंदाजित ३३ हेक्टर क्षेत्र सिंचित होते. तसेच टिटवी, महिदंळे या गावांना गिरणा नदीवरून ०.१८ दलघमी पिण्याच्या पाण्याचे आरक्षण मंजूर आहे.

भोंडणदिगर या गावास पारोळ शाखा कालव्याच्या B६ आणि B६' चारीद्वारे सिंचन व बिंगरसिंचनासाठी पाण्याच्या पुरवठा केला जातो.
(२) हे, खरे नाही.

चोरवड गावाचे अंदाजित ३३ हेक्टर क्षेत्र सिंचित होत आहे. तसेच शिरसमणी लघु प्रकल्पातून पारोळा

(जि. जळगांव) तालुक्यातील मौजे चोरवड या गावास ०.०९७ दलघमी व आकस्मिक आरक्षण ०.०५५ दलघमी पिण्याच्या पाण्याचे आरक्षण मंजूर आहे.

(३) अंशत: खरे आहे

पारोळा तालुक्यातील मौजे चोरवड, टिटवी, महिंदळे, भोंडण या गावातील ग्रामस्थांनी पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी केंद्रीय जलशक्ती मंत्री मा.श्री.सी.आर.पाटील यांना दिनांक २४.०२.२०२५ अन्वये निवेदन दिलेले असुन सदर निवेदनाची प्रत माहितीस्तव मा. ना. जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिलेली आहे.

(४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक २२/०७/२०२५ पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. त्याअन्वये जामदा डावा कालवा व मौजे चोरवड, टिटवी, महिंदळे, भोंडण ता. पारोळा जि. जळगांव परीसर यांच्या उंचीतील फरक २६.७८ मी. आहे. परिणामी, सदरील गावांना जामदा डाव्या कालव्यातून सा.क्र. २५९०० मी. वरुन नैसर्गिक पध्दतीने (कालवा प्रवाही पध्दतीने) पाणी देणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही. त्यामुळे अव्यहार्य आहे.

तसेच गिरणा उपखोरे हे तुटीचे खोरे असून सदरील योजनेस पाणी उपलब्ध नाही. तथापि जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र: संकिर्ण- १०.०१/ (३७८/२००१)/सिं.व्य (धो), मंत्रालय मुंबई दिनांक २१ नोव्हेंबर, २००२ नुसार कालव्याच्या वरील भागातील शेतक-यांना प्रकल्पीय सिंचन क्षेत्राच्या अनुज्ञेय १०% क्षेत्रापर्यंत वैयक्तिक उपसाद्वारे परवानगी देणे शक्य आहे.

प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा मतदार संघातील दहिगाव उपसा सिंचनचे अविरतपणे संकल्पित विसर्ग नुसार सुरळीतपणे सुरु राहण्याचे दृष्टीने टप्पा क्र.-१ येथे एक तसेच टप्पा क्र.-२ येथे एक स्टँड बाय/अतिरिक्त पंप बसविण्याबाबत**

**(५) १२९४२ (२४-०७-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा मतदार संघातील दहिगाव उपसा सिंचनचे अविरतपणे संकल्पित विसर्गानुसार सुरळीतपणे सुरु राहण्याच्यादृष्टीने व योजनेतील लाभधारकास समन्यायी तत्वाने त्यांच्या हक्काचे पाणी मिळावे याकरीता टप्पा क्र.-१ येथे एक तसेच टप्पा क्र.-२ येथे एक स्टँड बाय/अतिरिक्त पंप बसविण्यात यावेत, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे जलसंपदा मंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दहिगांव उपसा सिंचन योजना पंपगृह टप्पा क्र. १ येथे प्रत्येकी ७५५ एच.पी क्षमतेचे एकूण ६ पंप व टप्पा क्र.२ येथे प्रत्येकी ७३० एच.पी क्षमतेचे एकूण ४ पंप कार्यान्वित आहेत. या दोन्ही ठिकाणी एकही अतिरीक्त / स्टँड बायपंप बसविणे करिता जागा (Slot/Bay) उपलब्ध नाही. तसेच, जलसंपदा विभाग, शासन निर्णय दिनांक ३०/०९/२०२० नुसार उपसा सिंचन योजनेत अतिरिक्त पंपाची तरतूद करता येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोईसर – तारापूर (जि. पालघर) एमआयडीसी मधील वस्त्रोद्योग कारखान्यांची सबसिडी थकीत असल्याबाबत**

**(६) १२९५१ (२८-०७-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील बोईसर - तारापूर एमआयडीसी मधील वस्त्रोद्योग कारखान्यांना शासनाकडून देण्यात येणारी विविध प्रकारची सबसिडी थकीत असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सबसिडीचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, उक्त थकीत असलेली सबसिडी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय सावकारे (१२-११-२०२५) :** (१) व (२) बोईसर-तारापूर एमआयडीसी येथील वस्त्रोद्योगांना थकीत भांडवली व विद्युत अनुदान तात्काळ देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७.०६.२०२५ रोजी मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांना निवेदन दिले आहे.

(३) भांडवली अनुदान वितरीत करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल तयार करण्यात आले आहे. भांडवली अनुदानाची मागणी केलेल्या वस्त्रोद्योग घटकांचे प्रस्ताव सदर ऑनलाईन पोर्टलद्वारे वस्त्रोद्योग आयुक्तालयास सादर केले जातात. सदर प्रस्तावांची तपासणी करुन परिपूर्ण प्रस्ताव वस्त्रोद्योग आयुक्तालयाकडून शासनास ऑनलाईन सादर केले जातात. भांडवली अनुदान मागणी केलेल्या वस्त्रोद्योग घटकांना नियोजन व वित्त विभागाने खर्चासाठी उपलब्ध करुन दिलेल्या निधीनुसार वस्त्रोद्योग घटकांना भांडवली अनुदान वितरित केले जाते.

तसेच राज्यातील वस्त्रोद्योग घटकांना वीजदर सवलत देण्याकरीता वस्त्रोद्योग आयुक्तालयाकडून एक ऑनलाईन पोर्टल तयार करण्यात आले असून सदर पोर्टलवर प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन ऑनलाईनद्वारे सदर प्रस्ताव वस्त्रोद्योग आयुक्तालयामार्फत शासनास मंजूरीकरीता सादर करण्यात येतात. शासनाच्या मंजुरीनंतर वस्त्रोद्योग घटकांना वस्त्रोद्योग घटकाच्या प्रकारानूसार वीजदर सवलतीचा लाभ देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील सीनामाढा सिंचन योजनेला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७) १३०१६ (०८-०९-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा तालुक्यातील (जि.सोलापूर) सीनामाढा सिंचन योजना २००४ साली कार्यान्वीत झाली असून सदर योजनेतील कन्हेरगाव, दहिवली, निमगाव टे., वरवडे, सापटणे टे., चिंचोली, अरण, भेंड, भुताष्टे, कुर्डु, लवूळ यासहर इतर गावातील शेतक-यांच्या भूसंपादित केलेल्या जमीनीचा मोबदला देण्यासाठी रुपये ३५ कोटी इतका रकमेचा प्रस्ताव मंजूर असून यापैकी रुपये २१ कोटी इतक्या रकमेच्या निधीची मागणी कृष्णा खोरे विकास महामंडळाने शासनाकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिंचन योजनेला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी जलसंपदा मंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने उक्त प्रस्तावास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०४-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

सीना माढा प्रकल्पांतर्गत भूसंपादन प्रकरणी रू.३०.०९ कोटी इतक्या निधीची मागणी आहे.

(२) होय.

(३) सीना माढा प्रकल्पांतर्गत मंजूर भूसंपादन प्रकरणी रु.३०.०९ कोटी इतक्या निधीची मागणी पैकी सप्टेंबर, २०२५ अखेर रु.२९.२१ कोटी एवढा निधी वितरीत झाला असून त्यापैकी रु.१८.३० कोटी मोबदला वाटप करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत थेट खरेदीद्वारे उर्वरीत क्षेत्र संपादित करून प्रत्यक्ष कालवा बाधित शेतकऱ्यांना मोबदला वाटपाचे काम सुरू आहे.

सीना माढा प्रकल्पासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.२०.०० कोटी इतक्या निधीची तरतुद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील शाळेच्या परिसरामध्ये खेळाचे मैदान उपलब्ध करून देण्याबाबत**

**(८) १३०७२ (०८-०९-२०२५). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे शाळेच्या आवारात नवनवीन इमारती उभारण्यात येत असून त्यामुळे शाळांचे खेळाचे मैदाने नष्ट होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील १५ पैकी १३ तालुक्यांमध्ये सुमारे ३०० शाळांमध्ये खेळाचे मैदान उपलब्ध नसून मैदानी अभावामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या शाळांमध्ये खेळाचे मैदान उपलब्ध नाही, त्या शाळांना मैदान उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१७-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २९/०६/२०१३ च्या शासन निर्णयान्वये ज्या शाळांना खेळाचे मैदान नसल्यास शाळेच्या परिसरामध्ये शासनाने ग्रामपंचायत, नगर परिषद, नगरपालिका, महानगरपालिका खाजगी मालकीचा जागा ना हरकत प्रमाणपत्र घेऊन तात्पुरत्या स्वरूपात खेळाचे मैदान उपलब्ध करून देण्याबाबत आदेशित केले आहे.

---

**जिल्हा परिषद पालघर यांनी सी.सी.टी.व्ही (CCTV) बसविण्याची**
**निविदा प्रक्रिया राबविली नसल्याबाबत**

**(९) १३१८८ (२९-०९-२०२५). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद पालघर अंतर्गत जि.प. शाळाच्या आवारात सी.सी.टी.व्ही (CCTV) बसविण्यासाठी जिल्हा

नियोजन अधिकारी यांच्या कडून नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत रु.३ कोटी ६० लक्ष निधी उपलब्ध करून दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सी.सी.टी.व्ही (CCTV) बसविण्याची निविदा प्रक्रिया जिल्हा परिषद पालघर, शिक्षण विभाग यांनी राबविली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची निविदा प्रक्रिया जिल्हा अधिकारी, पालघर यांनी राबवावी असा प्रस्ताव शिक्षण अधिकारी प्राथमिक यांनी तत्कालीन मा.मुख्याधिकारी, जिल्हा पालघर यांना सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन देखील कार्यारंभ आदेश देण्याच्या स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे तसेच, उक्त काम पूर्ण होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडून प्राप्त महितीनुसार, पालघर जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या जिल्हा परिषद शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. बसविण्याकरिता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, पालघर यांच्याकडे रक्कम रुपये १४.८४ कोटी इतक्या निधीची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी रु. ३.६० कोटी ची प्रशासकीय मान्यता सन २०२४-२०२५ या वर्षात देण्यात आली होती.

सदर योजनेची निविदा प्रक्रिया व खरेदी प्रक्रिया ही जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, यांच्या स्तरावर राबविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे सांजा (ता. व जि. धाराशिव) येथील जिल्हा परिषद शाळेतील स्वयं अर्थसहाय्यित अट शिथिल करून शिक्षक नेमणुकीबाबत

**(१०) १३१९३ (०८-०९-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सांजा, (ता. व जि. धाराशिव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेस शासन निर्णय दिनांक १२ डिसेंबर, २०१८ अन्वये माध्यमिक विभाग स्वनिधीतून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेतील इयत्ता ९ वी व १० वीसाठी स्वयं अर्थसहाय्यित ही अट शिथिल करून कायमस्वरूपी शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे पत्राद्वारे मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकीकडे राज्यातील काही भागात विद्यार्थ्यांची घटलेली पटसंख्या लक्षात घेता शिक्षक अतिरिक्त होत असताना, मौजे सांजा येथील ग्रामस्थांनी स्वतः आर्थिक भर घालून शाळा चालविण्याची जबाबदारी घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील पत्राच्या अनुषंगाने स्वयं अर्थसहाय्यित ही अट शिथिल करून शिक्षकांची नियमित नेमणूक करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०५-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्राथमिक शाळांचे सक्षमीकरण व दर्जावाढ करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय, दिनांक १५/०३/२०२४ नुसार सुधारीत कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार जिल्हा परिषदेसाठी पायाभूत पदे निश्चित करण्यात आली आहे. या पायाभूत पदांच्या मर्यादेत, माध्यमिक शाळेकरीता शिक्षकांची पदे वापरण्याचे अधिकार संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही अनुज्ञेय आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाच्या अंमलबाजावणीसाठी कायम स्वरुपी पदे भरण्याबाबत

**(११) १३२२० (२४-०७-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाच्या अंमलबाजावणीसाठी विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयकांची ६ पदे आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांची ३६ पदे अशी एकूण ४२ पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात येत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागतिक हवामान बदलांमुळे जगभर नैसर्गिक आपत्तींची संख्या वाढत असून राज्यात देखील मागील काही वर्षांपासून वारंवार समुद्री वादळ, अवकाळी पाऊस, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पार्श्वभूमीवर भविष्यातील नैसर्गिक आपत्तीच्या समस्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ही पदे सेवेत कायम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-१२-२०२५) :** (१) मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या बैठकीत मान्यता दिल्यानुसार आणि दिनांक २ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी ३६ जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी व ६ विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक अशी एकूण ४२ पदे कायमस्वरुपी निर्माण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरहू सर्व पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यासही मान्यता दिली आहे.

(२) होय

(३) सदरहू ४२ पदे कायमस्वरुपी निर्माण करुन कंत्राटी स्वरुपात करण्यास मान्यता दिलेली असल्याने एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सदरहू पदांना मुदतवाढ देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड यांच्या अखत्यारितील अतिरिक्त जमीन न्यायालये, न्यायाधीश निवासस्थाने आणि ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी देणेबाबत**

**(१२) १३२६४ (२८-०७-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागांतर्गत गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्या अधिपत्याखालील उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड यांच्या अखत्यारितील मदुखेड नगर पंचायत हद्दीतील गट क्र. ४६० मधील विनावापर ४.४० हे. जमिनीपैकी २.४० हे. न्यायालये आणि न्यायाधीश निवासस्थानासाठी तसेच २.०० हे. जमीन ग्रामिण आरोग्य प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी वापरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यादरम्यान विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विनंतीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०८-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तावित न्यायालय व न्यायाधीश निवासस्थानासाठी इमारत २.४० हे. जमिनीची कायमस्वरुपी हस्तांतरणाबाबत नियामक मंडळाच्या ८३/२६ व्या बैठकीत विषय मांडुन जमिनीचे मुल्यांकन किंमत रु.७.०५ कोटी महामंडळास जमा करण्याच्या अटीवर ठराव मंजुर करण्यात आलेला आहे. मुल्यांकन किंमत जमा करण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांचेकडे दिनांक १४/१०/२०२४ रोजी मंडळ कार्यालयाने लेखी पत्राद्वारे मागणी केलेली असून अद्याप संबधीत यंत्रणेमार्फत महामंडळाच्या ठरावातील अटीनुसार निधी जमा केलेला नाही. त्यामुळे अद्याप २.४० हे.जमीन हस्तांतरण करण्यात आली नाही.

प्रस्तावित ग्रामिण आरोग्य प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी २ हेक्टर जागेची मागणी दिनांक १७/३/२०२५ रोजी प्राप्त झाल्यावर, नियामक मंडळाच्या ८६/०३ व्या बैठकीत कायमस्वरुपी हस्तांतरणाबाबत विषय मांडण्यात आलेला असून ठराव मंजूर झाला आहे. जमिनीची मुल्यांकन किंमत रु. ८.५४ कोटी महामंडळास जमा करण्याची हमी वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दिनांक ३/१०/२०२५ रोजी दिली आहे. मुल्यांकन किंमत जमा झाल्यावर २ हेक्टर जमिनीच्या हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पवित्र पोर्टलवरील उर्दू माध्यमातील शिक्षक पदे रिक्त असल्याबाबत**

**(१३) १३२९२ (०८-०९-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पवित्र पोर्टलवरील उर्दू माध्यमातील शिक्षक पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका मधील रिक्त पदे भरण्याकरिता आवश्यक असलेले रोस्टर अधिनस्त शिक्षण अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांनी अद्याप शासनाकडे सादर केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अल्पसंख्याक समाजातील उमेदवार व विद्यार्थ्यांवर अन्याय झालेला असून, यासंदर्भात अल्पसंख्याक लोकप्रतिनिधींनी शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक २२ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पत्रव्यवहार केला आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर शिक्षणाचा हक्क कायदा (RTE) उल्लंघन केल्याबद्दल शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१३-०१-२०२६) :** (१), (२) व (३) अल्पसंख्यांक समाजातील उमेदवार व विद्यार्थ्यांवर अन्याय होत असलेबाबतच्या तक्रारी शासनास लोकप्रतिनीधी व विविध संघटना यांचेकडून प्राप्त होत असतात. शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ नुसार पहिल्या टप्प्यामध्ये उर्दू माध्यमाच्या १८५० रिक्त पदांची जाहिरात आली. यामध्ये १७२२ पदांवर पवित्र पोर्टलमार्फत शिफारस करण्यात आली. तसेच दूसऱ्या टप्प्यामध्ये २३८ पदांपैकी ९७ पदांवर शिफारस झाली आहे. पहिला टप्पा व दुसरा टप्पा मिळून एकूण २६९ पदे रिक्त राहिली आहेत. तसेच शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ घेण्यात आली असून, त्याचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. यामध्ये सर्व माध्यमांच्या रिक्त पदांच्या जागा भरतीमध्ये याव्यात म्हणून सामान्य प्रशासन विभागाने बिंदुनामावलीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशास अनुसरुन बिंदुनामावली तातडीने अद्ययावत करणेबाबतच्या सूचना सर्व नियुक्ती प्राधिकारी यांना करण्यात आलेल्या आहेत. तसेच उर्दू माध्यमातील शाळांना त्याच माध्यमातून शिक्षण घेतलेले उमेदवार अध्यापनाकरीता उपलब्ध व्हावेत याकरीता सेमी इंग्रजी व भाषा विषयाच्या पदभरतीसाठी देखील इ.१० वीचे माध्यम विचारात घेण्याबाबत दिनांक ०६.०९.२०२४ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे. यास्तव लवकरात लवकर बिंदुनामावली अद्ययावत होऊन जास्तीची शिक्षकांची मागणी पवित्र पोर्टलवर नोंदविण्याकरीता शासन प्रयत्नशिल आहे. तसेच याअनुषंगाने आवश्यक त्या सूचना वेळोवेळी निर्गमित करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) उपरोक्तप्रमाणे नमूद केल्यानुसार सन २०२५ च्या अभियोग्यता चाचणीनुसार रिक्त शिक्षकीय पदे भरण्यात येणार आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पैनगंगा नदीवर पिंपरड, परसोडा (जि.झरी) व तेजापूर, जुगाद (ता.वणी, जि.यवतमाळ) येथे बॅरेज बंधारे बांधून कालव्यांची निर्मिती करुन जलसिंचनाची व्यवस्था करण्याबाबत

**(१४) १३३८१ (१९-०८-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील सिंचन क्षमतेच्यादृष्टीने महत्वाचा उपक्रम ठरणाऱ्या घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यात ताडसावली येथे प्रस्तावित असलेल्या निम्न पैनगंगा सिंचन प्रकल्पाच्या अंमलबजावणीला होत असलेल्या विलंबामुळे यवतमाळ, चंद्रपूर, नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अपेक्षित लाभ मिळू शकलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच पैनगंगा नदीवर पीपरड (जि.झरी) व तेजापूर, जुगाद (जि.यवतमाळ) येथे बॅरेज बंधारे बांधून कालव्यांची निर्मिती करुन जलसिंचनाची व्यवस्था करावी अशी मागणी वणी तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतीकडून संबंधित विभागाकडे वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, उक्त मागणीच्या अनुषंगाने पैनगंगा नदीवर बॅरेज बंधारे बांधून कालवे निर्मितीच्या अनुषंगाने प्रस्तावित प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने काय

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम शासनाकडून सुरू करण्यास परवानगी प्राप्त असून सद्यस्थितीत प्रकल्पाचे काम प्राथमिक अवस्थेत आहे. प्रकल्पाचे बांधकाम तीन टप्प्यामध्ये नियोजित असून त्यानुसार कार्यवाही प्रगतीपथावर आहे. प्रकल्पाचे मुख्य धरणाचे काम प्रगतीपथावर असून प्रथम टप्प्यातील १३ गावांचे भूसंपादन व पुनर्वसनाची कार्यवाही सुरु आहे.
(२) अंशत: हे खरे आहे.

पैनगंगा नदीवर पिंपरड परसोडा (झरी) व तेजापूर बंधाऱ्याचे बांधकाम प्रस्तावित करण्यात आले आहे. जुगाद (ता.वणी जि. यवतमाळ) सदर स्थळी बंधारा प्रस्तावित करण्यात आलेला नाही.
(३) गोदावरी पाणी वाटप तंटा लवादानुसार पैनगंगा उपखोऱ्यातील निम्न पैनगंगा धरणापासून ते पैनगंगा नदीच्या वर्धा नदी संगमाच्या पाण्यापैकी (९.०० टी.एम.सी.) पाणी वापर महाराष्ट्र राज्यास अनुज्ञेय आहे. निम्न पैनगंगा धरण ते वर्धा नदी संगमापर्यंच्या भागात पैनगंगा नदीवर ६ उच्च पातळी बंधारे अनुक्रमे उनकेश्वर, भिमकुंड, चनाखा कोर्टा, दिग्रस, पिंपरड परसोडा व तेजापुर प्रस्तावित केलेले आहे. या पैकी अनुक्रमे भिमकुंड, चनाखा कोर्टा, दिग्रस. पिंपरड हे ४ उच्च पातळी बंधारे महाराष्ट्र व तेलंगणा या राज्यातील आंतरराज्यीय बंधारे आहेत.

सदर भीमकुंड बंधारा, दिग्रस बंधारा, पिंपरड-परसोडा बंधारा, तेजापुर बंधारा व त्यावरील उपसा सिंचन योजने करिता तेलंगणा व महाराष्ट्र राज्याच्या संयुक्त आंतरराज्य मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच प्रकल्पाचे सविस्तर सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सीना नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे लातूर टाईप बॅरेज मध्ये रूपांतरण करणेबाबत

**(१५) १३४५९ (१९-०८-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर व बीड या दोन जिल्ह्यातून सीना नदी वाहत असून या नदीवर २५ वर्षांपूर्वी १५ कोल्हापूर टाईप पद्धतीचे बंधारे बांधण्यात आले असून सदर बंधारे लोखंडी दरवाज्याच्या पद्धतीचे असल्याने त्याची पाणी साठवण क्षमता अतिशय कमी असून त्याच्या गळतीमुळे अजिबात पाणी साठवले जात नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत शासन काळात सीना नदीवरील दहा कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे लातूर टाईप बॅरेज मध्ये रूपांतर करण्याकरिता सर्वेक्षण व अन्वेषण अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत सर्व्हेचे देखील काम पूर्ण झाले असून सीना नदीवरील १० कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांपैकी आष्टी तालुक्यातील चार कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांना मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे, परंतु कर्जत तालुक्यातील बंधाऱ्यांना अद्यापही मान्यता देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे लातूर टाईप बॅरेज मध्ये रूपांतर झाल्यास कर्जत व जामखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी मुबलक पाणी उपलब्ध होणे शक्य होईल त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार पत्राद्वारे माहे मार्च, २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मागणी करुन देखील अद्याप कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०१-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.

सदर बंधारे लोखंडी दरवाज्याच्या पध्दतीचे असून काही बर्गे जुने व गंजलेले असल्याने त्यामधून पाण्याची गळती होत असते. तथापि या गळतीमुळे को.प. बंधा-यांमध्ये अजिबात पाणी साठवले जात नाही, ही बाब वस्तुस्थीतीस धरुन नाही. को.प. बंधा-यांमध्ये पाणी साठवले जाते.

(२) हे खरे आहे.

जलसंपदा विभागाने दिनांक २८/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सीना नदीवरील आष्टी तालुक्यातील ६, कर्जत तालुक्यातील ३ व जामखेड तालुक्यातील १ असे एकूण १० को.प. बंधाऱ्यांचे रूपांतरण लातूर टाईप बॅरेजमध्ये करणेची कामे विस्तार व सुधारणा अंतर्गत हाती घेण्याच्या दृष्टीने आवश्यक सर्वेक्षण व अन्वेषण करण्यास प्रायोगिक तत्त्वावर मान्यता दिली आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

आष्टी तालुक्यातील ६ को.प.बंधाऱ्यांचे रूपांतरण बॅरेजमध्ये करण्याच्या दृष्टीने आवश्यक सर्वेक्षण व अन्वेषण पूर्ण झाले असून त्यानुसार पिंपरी घुमरी व पिंपळसुटी हे दोन को.प. बंधारे सुस्थितीत असल्याने त्यांच्या रूपांतरणाची आवश्यकता नाही. उर्वरित ४ को.प.बंधाऱ्यांचे प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव शासनास सादर असून त्याबाबतची शेरेपूर्तता क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

कर्जत तालुक्यातील ३ व जामखेड तालुक्यातील १ अशा एकूण ४ को.प.बंधाऱ्यांच्या सर्वेक्षण व अन्वेषणाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) हे अंशतः खरे आहे.

माहे मार्च, २०२३ मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबत लक्षवेधी सूचनेद्वारे मागणी केलेली आहे.

(५) कर्जत व जामखेड तालुक्यातील एकूण ४ को.प.बंधाऱ्यांच्या सर्वेक्षण व अन्वेषणाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत असून सर्वेक्षण व अन्वेषण पूर्ण करून प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर करणच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## कुकडी प्रकल्पातील डिंभे-माणिक डोह बोगद्याच्या कामाबाबत

**(१६) १३४६१ (१९-०८-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी प्रकल्पातील डिंबे माणिक डोह या बोगद्यास मान्यता देण्यात आली असून पावसाळयात डिंभे धरणातून वाहून जाणारे पावसाचे पाणी हे बोगद्याद्वारे माणिक डोह धरणात साठवण्याचे शासनाचे प्रयोजन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बोगद्याचे काम पूर्ण झाल्यास पुणे, सोलापूर, अहमदनगर जिल्हा व कर्जत, जामखेड, पारनेर, श्रीगोंदा इत्यादी तालुक्यांना एक जादाचे आवर्तन मिळू शकते व पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, शिरूर या तालुक्यांचा पाणी कोटा अबाधित राहू शकतो हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माणिक डोह धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कमी पाऊस पडत असल्यामुळे हे धरण पाच वर्षातून एकदाच भरते, परंतु या बोगद्याचे काम झाल्यास डिंभे धरणाचे वाहून जाणारे पावसाचे अतिरिक्त पाणी बोगद्याच्या माध्यमातून माणिक डोह धरणात साठविल्यास माणिक डोह धरण दरवर्षी भरणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बोगद्याचे काम झाल्यास माणिक डोह धरण दरवर्षी भरणार असल्यामुळे पुढील काळात कुकडी प्रकल्पाच्या पाण्याचे नियोजन होऊन शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावू शकतो, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, डिंभे माणिक डोह बोगद्याचे काम सुरू करणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०४-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

डिंभे-माणिकडोह बोगद्याचा कुकडी प्रकल्पाच्या प्रस्तावित चतुर्थ सुप्रमा अहवालामध्ये समावेश करण्यास शासनाने दिनांक २८/०६/२०२२ च्या पत्रान्वये तत्वत: मान्यता दिली आहे.

सदर प्रस्तावित बोगद्याचा मुख्य उद्देश डिंभे डावा कालव्याद्वारे येडगाव धरणात सोडायच्या ६.२१ TMC पाण्यासाठी पर्यायी मार्ग उभारणे हा आहे. मात्र या बोगद्याद्वारे पावसाळ्यात डिंभे धरणातून सांडव्यावरून पाणी वाहुन जाताना त्यातील काही पाणी माणिकडोह धरणात साठवले जाऊ शकेल.
(२) डिंभे - माणिडोह बोगदा पुर्ण झाल्यास डिंभे धरणातुन येडगाव धरणास सोडावयाचे ६.२१ टीएमसी पाणी पुरेशा विसर्गाने व अपेक्षित वेळी येडगाव धरणात पोहचुन कुकडी डावा कालव्याचे आवर्तन विनाव्यत्यय व सुरळीत पार पडेल व याचा लाभ कर्जत, जामखेड, पारनेर, श्रीगोंदा इत्यादी तालुक्यांना होईल.

तसेच कुकडी प्रकल्प नियोजनानुसार डिंभे धरणातून डिंभे डावा कालव्याद्वारे येडगाव धरणात सोडावयाचे ६.२१ TMC पाणी बोगद्याद्वारे सोडल्याने पुणे जिल्ह्यातील तालुक्यांचे पाणी अबाधित राहून त्यावर काही परिणाम होणार नाही.
(३) माणिकडोह धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये कमी पाऊस पडत असल्यामुळे माणिकडोह धरण दरवर्षी सरासरी ६५% ते ७०% भरते.

डिंभे डावा कालव्याच्या वहन क्षमतेच्या अडचणीमुळे डिंभे धरणातून येडगाव धरणात सोडावयाचे ६.२१ TMC पाणी डिंभे डावा कालव्यास पर्याय म्हणुन डिंभे - माणिकडोह बोगद्याद्वारे सोडणे प्रस्तावित आहे.
(४) डिंभे - माणिकडोह बोगदा पुर्ण झाल्यास डिंभे धरणातुन येडगाव धरणास सोडावयाचे ६.२१ टीएमसी पाणी पुरेशा विसर्गाने व अपेक्षित वेळी येडगाव धरणास पोहचुन कुकडी डावा कालव्याचे आवर्तन विनाव्यत्यय व सुरळीत पार पडेल.
(५) डिंभे-माणिकडोह बोगदयाच्या कामाचा अंतर्भाव करुन कुकडी प्रकल्पाचा चतुर्थ सुप्रमा प्रस्ताव रातांसस-२, पुणे यांच्याकडे सादर करण्यात आला असून क्षेत्रिय स्तरावर पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सेवा निवृत्त शिक्षक पेन्शन योजना (सेवानिवृत्ती वेतन योजना) अनियमितेबाबत

**(१७) १३४७३ (०८-०९-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सेवा निवृत्त शिक्षकांच्या पेन्शन योजनेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता आढळून येत असून संबंधित शिक्षकांना आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, पेन्शन मिळवण्याची प्रक्रिया ही अत्यंत गुंतागुंतीची व त्रासदायक असून नियोजनशून्य प्रशासन व

संबंधित अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे शिक्षकांना विविध अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पेन्शन योजनेतील गैरव्यवहार व त्रुटींविरोधात अधिक पारदर्शक व सुलभ करण्याची मागणी शिक्षक संघटनांकडून करण्यात येत आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, योजना अधिक प्रभावी, पारदर्शक व शिक्षकहिताची बनविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१३-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) अशा आशयाची निवेदने प्राप्त होत आहेत.
(४) प्रलंबित निवृत्तीवेतन विषयक सवलतींस अनुसरुन जिल्ह्यांकडून प्राप्त माहिती आणि संबंधित संचालनालयाकडून प्राप्त पुरवणी मागणीचा प्रस्ताव सन- २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात आला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्रलंबित रकमा संबंधितांना वितरित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील कमवा आणि शिका योजनेबाबत

**(१८) १३४९२ (०८-०९-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ‘कमवा आणि शिका’ या योजनेतील विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ७००–८०० वरून केवळ १५०–२०० पर्यंत कमी करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या संघटनांवर दबाव आणला जात असून राजकीय अजेंडा असलेल्या संघटनांना प्रोत्साहन दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाबींची चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर योजना संख्यात्मकदृष्ट्या मर्यादित करण्यामागचे कारण काय असून योजनेतील पूर्वीची संख्या कायम ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील कमवा आणि शिका या योजनेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी करण्याबाबत कोणतेही निर्देश देण्यात आलेले नाहीत. सदर योजना विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये व संलग्न महाविद्यालयांमध्ये नियमितपणे राबविण्यात येत असून पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन या योजनेत सहभागी होण्याची संधी दिली जाते.
(२) हे खरे नाही.

विद्यापीठात शैक्षणिक वातावरण अबाधित ठेवून नियमावलीनुसार सर्व विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो.
(३) वरीलप्रमाणे कोणतीही बाब निदर्शनास आलेली नसल्याने चौकशी अथवा कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) सदर योजना संख्यात्मकदृष्ट्या मर्यादित करण्यात आलेली नाही. विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासून ते द्वितीय सत्राच्या प्रारंभापर्यंत नियमानुसार या

योजनेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सहभागावर कोणतीही मर्यादा घालण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणीबाबत**

**(१९) १३६९१ (२४-०७-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर क्षेत्रातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी चालू असलेल्या शिष्यवृत्ती योजनांची सद्यस्थिती काय असून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच शासनाच्या वतीने प्रभागस्तरावर जागरूकता वाढविण्यासाठी उपक्रम राबविण्यात येत आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनांविषयी जनजागृतीसाठी विशेष मोहिमा व स्थानिक संस्था, शाळा व समुदाय यांच्याशी समन्वय साधून योजना व उपक्रम राबविले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील शैक्षणिक वर्षात मुंबईतील किती अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना योजनेंतर्गत शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे तसेच या योजनेत लाभार्थ्यांची संख्या अपुरी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिष्यवृत्ती अर्जप्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना व पालकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाच्या वतीन कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (०६-०३-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे,

राज्यातील अल्पसंख्याक समुहातील घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांची शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक प्रगती होऊन त्यांचा जीवनमानाचा स्तर उंचवावा याकरिता अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची तळागाळातील लोकांना माहिती व्हावी व त्यांना याचा लाभ मोठ्या प्रमाणात घेता यावा याकरिता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांना विविध समाजमाध्यमाद्वारे व्यापक प्रसिद्धी देण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही,

उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. याअंतर्गत शिष्यवृत्तीची संख्या तांत्रिक अभ्यासक्रमांसाठी १५,००० व वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी २,५०० इतकी आहे. तसेच इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या (उदा. कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम) विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्तीची संख्या २००० इतकी आहे. तसेच नूतनीकरण अर्जासाठी मर्यादा नाही. यानुसार सन २०२४-२५ मध्ये एकूण २८,४७६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. तसेच याअंतर्गत मुंबई शहरातील २८७५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.
(४) शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना व पालकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी महाविद्यालय स्तरावरून अल्पसंख्याक शिष्यवृत्तीकरिता महाडिबीटी पोर्टलवर अर्ज दाखल करण्याकरिता पूर्णपणे सहाय्य करण्याकरिता सूचना देण्यात येत असतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**१० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळेत कायमस्वरुपी तत्वावर शिक्षकांची भरती करण्याबाबत**

**(२०) १३७३६ (०८-०९-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये शिक्षकांची भरती कंत्राटी तत्वावर करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील मान्यता प्राप्त संचांनुसार उपलब्ध अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन आणि नियुक्ती प्रक्रियेनंतरच कंत्राटी शिक्षकांची भरती करण्यात येणार असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर ग्रामीण विभागातील विविध तालुक्यांमध्ये कंत्राटी भरतीसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त झाले असून, रामटेक २५८, मौदा २३४, उमरेड २०६, कळमेश्वर १७१, काटोल ३२४, सावनेर २४०, नागपूर ग्रामीण ४५० इत्यादी अर्ज प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भरती प्रक्रिया ही केवळ कंत्राटी तत्वावर राबविण्यात येणार आहे की, पात्र उमेदवारांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्याचा विचार शासन करीत आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२०-११-२०२५) :**(१), (२) व (३) होय हे खरे आहे.

(४) व (५) कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता २० व २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांवर मंजूर दोन शिक्षकांपैकी एक सेवानिवृत्त शिक्षक /डीएड बीएड अर्हताधारक बेरोजगार शिक्षकाची मानधनावर कंत्राटी तत्वावर नियुक्त करणेबाबतचा निर्णय दिनांक ०५.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. तसेच दिनांक २३.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सदरचा शासन निर्णय अधिक्रमित करुन, १० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांवर कंत्राटी तत्वावर शिक्षक नियुक्ती करणेबाबत निर्णय घेण्यात आला. तथापि, शिक्षक भरतीचा दूसरा टप्पा सुरु झाला असल्याने पवित्र पोर्टलमार्फत नियमित शिक्षकांची नियुक्ती होणार आहे. यास्तव उक्त दिनांक ०५.०९.२०२४ व दिनांक २३.०९.२०२४ चे शासन निर्णय दिनांक १०.०२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात आला आहे. तसेच सद्यस्थितीत शासन पत्र दिनांक ०७.०७.२०२३ नुसार करण्यात येत असलेली कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती देखील पवित्र पोर्टलमार्फत नियमित शिक्षक नियुक्त होईपर्यंतच करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे डेरला (ता.लोहा, जि.नांदेड) येथील शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्प अंतर्गत डेरला उपसा सिंचन योजना कार्यरत नसल्याबाबत**

**(२१) १३८४९ (१९-०८-२०२५). श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डेरला (ता.लोहा, जि.नांदेड) येथे शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्प अंतर्गत डेरला उपसा सिंचन योजनेचे काम सन २०१२ मध्ये पूर्ण करण्यात आले, परंतु अद्याप पर्यंत सिंचनास सुरुवात झाली नसल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत डेरला उपसा सिंचन योजनेच्या ३७५ HP च्या तीन पंपापैकी एक पंप नादुरुस्त,

बॅकअप ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त तर पॅनलमधील बॅटरी डिसर्चाज असल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डेरला उपसा सिंचन योजनेच्या शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्प कार्यरत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर उपसा सिंचन प्रकल्पातील विद्युत उपकरणांची तात्काळ दुरुस्ती करुन उपसा सिंचन प्रकल्प लवकरात लवकर कार्यरत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदरील योजना जून, २०१४ अखेर पूर्ण झाली आहे. या योजनेच्या लाभक्षेत्रात सिंचनासाठी अद्याप पाणी सोडण्यात आलेले नाही. तथापि सन २०१७ व २०१९ मध्ये लोहा तालुक्यातील सोनखेड व दापशेड तलाव भरून देण्यात आला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर उपसा सिंचन प्रकल्पातील विद्युत उपकरणांची तात्काळ दुरूस्ती करण्यासाठी सदरील कामाचा समावेश चालू वर्षाच्या देखभाल दुरूस्ती अंतर्गत करण्यात आला असून, योजना कार्यान्वित करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहराचा काही भाग हा दरवर्षी सरासरी ०.०१ सेमी ते ५.९ सेमीने पाण्याखाली जात असल्याबाबत**

**(२२) १४०३७ (१९-०८-२०२५). डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंगापूरच्या "नानयांग टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी" (एनटीयू) ने त्यांच्या संशोधनाच्या टीमने केलेल्या अभ्यासानुसार आशिया, आफ्रिका, युरोप आणि अमेरिका खंडातील ४८ शहरांचा भूभाग हा बदलत्या हवामानानुसार समुद्राची पातळी वाढत असल्यामुळे शहरे बुडण्याचा धोका व्यक्त केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ४८ शहरांमधील मुंबई शहराचा देखील काही भाग हा दरवर्षी सरासरी ०.०१ सेमी ते ५.९ सेमीने पाण्याखाली गेल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईमधील पाण्यात बुडत असलेल्या भागात जवळपास ३२ लाखांहून अधिक लोकसंख्या असल्याची बाब देखील उघडकीस आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भूजलाचा मोठ्या प्रमाणात होत असलेला उपसा, गगनचुंबी किंवा उंच इमारतींचे बांधकाम, उद्योजकांकडून पाणथळ जमिनीची पुनर्बांधणी ही सर्व शहराच्या भूस्खलनाची किंवा भूभाग पाण्याखाली जाण्याची कारणे असल्याचे तज्ञांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१७-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे. सन २०१९,२०२१ मध्ये आलेल्या महापूराने नागरिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. परंतु २०२३ मध्ये आलेल्या पुरामुळे नागरिकांचे अंशत: नुकसान झाले आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) मौजे चंदूर (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथील पूरग्रस्त लोकांसाठी निवारा शेड बांधकाम करण्याचा रु. ९९९.७९ लक्ष इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सादर केला आहे. सदर काम प्राधान्यक्रम, मंजूरी, निकष निधी उपलब्धतेच्या अधीन राहून करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिक्षक भरती मध्ये "सरप्लस तुकडी" दाखवून इतर शिक्षकांची नियुक्ती करत असल्याच्या तक्रारीबाबत**

**(२३) १४०४३ (०८-०९-२०२५). डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक शिक्षण संस्था शिक्षक भरती करत असताना "सरप्लस तुकडी" दाखवून जुन्या विनाअनुदानित शिक्षकांवर अन्याय करून आर्थिक हितसंबंध जोपासण्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्याचे माहे मे, २०२५ निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थ मंडळ शिरवणे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, नेरुळ (नवी मुंबई) या संस्थेतील संचालक मंडळाने दिनांक १२ एप्रिल, २०१२ रोजी श्री. रमाकांत आसाराम पाटील व श्री. दीपक प्रतापसिंग पाटील यांची नियुक्ती करताना, त्या पदासाठी पात्र असलेल्या श्रीमती सुनिता शांताराम कदम यांच्यावर अन्याय झाल्याची तक्रार प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री. रमाकांत पाटील (D.Ed. २००९) व श्री. दीपक पाटील (D.Ed. २००७) यांची शिक्षक सरप्लस म्हणून नियुक्ती करण्यात आली तसेच या प्रक्रियेमध्ये तत्कालीन शिक्षण अधिकाऱ्यांचे व संस्थाचालकांचे आर्थिक हितसंबंध जोपासले गेल्याचा संशय तक्रारीत नमूद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वरील दोन शिक्षकांची भरती करतेवेळी कोणती कागदपत्रे विचारात घेण्यात आली होती, तसेच त्यांची पूर्वसेवा कुठे व कधी होती, याची तपशीलवार माहिती मागविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१३-०१-२०२६) :** (१) विनाअनुदानित तत्वावरील नियुक्त शिक्षकांवर अन्याय होत असल्याबाबतच्या तक्रारी शासनास प्राप्त होत असतात.
(२) होय हे खरे आहे.
(३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

श्रीम.कदम यांनी शाळेतील बोगस नियुक्तीबाबत दाखल केलेल्या तक्रारीनुसार विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे दिनांक १०/०३/२०१७ रोजी सर्व संबंधितांची सुनावणी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये श्रीम.कदम या इयत्ता ६ वी ते ८ वी इयत्तेकरीता शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्याने माध्यमिक विभागातील त्यांच्या नेमणूकीबाबतची कार्यवाही करता येत नाही श्रीम. कदम यांची प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागात केलेली नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने संस्थेने दिनांक ११/०४/२०१७ रोजीच्या आदेशानुसार श्रीम.कदम यांची सेवा समाप्त केली आहे. सदर आदेशाविरुध्द श्रीम.कदम यांनी मा.शाळा न्यायाधिकरण, नवी मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या याचिकेवर श्रीम. कदम यांचे विरोधात निर्णय झाला आहे. तद्नंतर श्रीम.कदम यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे याचिका दाखल केली असून प्रकरण सद्यस्थितीत न्याय प्रविष्ठ आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा खैरी (ता.काटोल, जि.नागपूर) येथील धरण प्रकल्पाबाबत**

**(२४) १४३३४ (१९-०८-२०२५). श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा खैरी (ता.काटोल, जि.नागपूर) येथील धरण प्रकल्प पूर्ण होवून जवळ-जवळ ३० वर्ष पूर्ण झाले असून नरखेड तालुक्यामध्ये लोहारी-सावंगा, खापा, घोगरा, लोहारा, जामगाव, रामठी, आरंभी, हिवरमठ या गावांचा लाभक्षेत्रात समावेश करण्यात येवून नळाद्वारे शेतीला पाणीपुरवठा करण्याचे ठरले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेरी धरण पूर्णत्वास येवून पाण्याचा लाभ उक्त गावांना देण्यात आला, तथापि, रामठी, आरंभी व हिवरमठ या गावांचा समावेश असतांना सुद्धा ही गावे पाणी पुरवठा करण्यापासून वगळण्यात आल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर तालुक्यातील मौजा कोल्हू, सावळी (अनंत), भोरगड, मोहगाव (जंगली), मोहगाव (ढोले), चौरेपठार, पांढरढाकणी ह्या सात गावाकरिता उपसा सिंचन (सौर उर्जा) योजनेद्वारे सिंचनाची व्यवस्था करणेकरीता प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सविस्तर आराखडा तयार करण्यात आला असून नियामक मंडळाची मान्यता प्राप्त असून उर्ध्व नलिका (Rising Main) अंथरण्याचे काम हे वन विभागाच्या क्षेत्रातून होण्याचे संभावित असल्यामुळे कार्यकारी अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ यांनी जागा मिळण्याबाबतचा प्रस्ताव वन विभागाकडे सादर करूनही त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर (कारप्रकल्प) पाण्याचा लाभ धरणालगत क्षेत्रातील असलेल्या काटोल व नरखेड तालुक्यातील गावांना कालव्याचे व सौर उर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून सिंचनाकरीता पाणी मिळणेकरीता वनविभागाकडून तात्काळ मान्यता प्राप्त झाल्यास विषयांकीत प्रकल्प कार्यान्वित होऊन त्याचा लाभ परिसरातील शेतकरी बांधवांना होणार, हे ही खरे आहे काय,

(६) याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे,

खापा व जामगाव वगळुन इतर सर्व गावांचा समावेश कार प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात करण्यात आला होता.

(२) होय खरे आहे,

तथापी रामठी, आरंभी वितरिकेची आर्थिक व तांत्रिक दृष्ट्या व्यवहार्यता योग्य नसल्यामुळे रामठी, आरंभी योजना वगळण्यात आली आहे.

(३) होय खरे आहे.

(४) होय खरे आहे.

(५) होय खरे आहे.

(६) उपविभागिय अभियंता, कार नदी प्रकल्प उपविभाग, कारंजा (घा.) या उपविभागाच्या दिनांक ०१.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये वनपरिक्षेत्र अधिकारी, नरखेड, जि. नागपूर व दिनांक ०१.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये वनपरिक्षेत्र अधिकारी, काटोल, जि. नागपूर यांना मंजूरी मिळणेस्तव वन प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सहा. वनपरिक्षेत्र अधिकारी, नागपूर (स्थित काटोल) यांनी मुद्दे उपस्थित केले होते. सदर मुद्यांचे अनुपालन उपविभागाच्या दिनांक २६/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेले आहे. सद्यःस्थितीत वनप्रस्ताव उपवनसंरक्षक अधिकारी, नागपूर यांचे कार्यालयात तपासणी करिता आहे.

---

## मुंबई विद्यापीठाने पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी केलेली शुल्कवाढ रद्द करण्याबाबत

**(२५) १४३५१ (०८-०९-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शुल्क वाढवले असून, विद्यापीठाशी संलग्न अनेक महाविद्यालयांनी देखील अभ्यासक्रमांची शुल्कवाढ केल्याचे दिनांक ३० मे, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढीव शुल्काच्या प्रमाणात आवश्यक त्या शैक्षणिक व मूलभूत सोयीसुविधा पुरवण्यात विद्यापीठ आणि महाविद्यालयांकडून कसूर केली जात असल्याने, वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शुल्कवाढ व सुविधा-कमी बाबींची शासनाने चौकशी करून शुल्कवाढ रद्द किंवा पुनर्विचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

मुंबई विद्यापीठाने मागील सुमारे १६ वर्षांच्या कालावधीत कोणतीही शुल्कवाढ केलेली नव्हती. दरम्यानच्या कालावधीत महागाई निर्देशांकात झालेली वाढ, प्रयोगशाळा-सुविधा व पायाभूत सुविधांच्या देखभाल-सुधारणांसाठी होणारा वाढीव खर्च तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीमुळे विद्यापीठाच्या खर्चामध्ये वाढ झाली आहे.

या पार्श्वभूमीवर अभ्यासक्रमातील मुख्यत्वे तांत्रिक शुल्क व विकास शुल्क या घटकांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर वाढ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ (त), कलम १०९ (शुल्क निर्धारण समिती) आणि कलम ३३ (ङ) अन्वये संबंधित प्राधिकरणांच्या मान्यतेनंतर करण्यात आलेली आहे. तथापि, शासन अनुदानित अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्कामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक व मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांद्वारे वंचित व दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येते.

(३) विद्यापीठाने शुल्कवाढीचा निर्णय महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी व विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या मान्यतेनंतर घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील चंद्रभागा नदीमध्ये कायमस्वरुपी पाणी राहण्याबाबत

**(२६) १४४०७ (१९-०९-२०२५). श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील चंद्रभागा नदीमध्ये कायमस्वरुपी पाणी रहावे, याकरिता शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करुन विष्णूपद मंदिराजवळ बंधारा बांधण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याकडे पाटबंधारे विभाग व मंदिर समिती यांचे दुर्लक्ष होत असून बंधाऱ्यांचे दरवाजे

उघडून पाणी सोडले जात असल्याने चंद्रभागा नदीतील पाणी वाहून जाते त्यामुळे भाविकांना नदीतील पवित्र स्नानापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनाला दररोज किमान ५० हजाराहून अधिक भाविक येत असून उन्हाळयामध्ये चंद्रभागा नदी कोरडी पडल्याने भाविकांना स्नानापासून वंचित रहावे लागते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बांधलेल्या बंधाऱ्यांतून पाणी वाहून जाऊ नये याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर बंधारा श्री.क्षेत्र देहू, आळंदी, भंडारा डोंगर, नेवासा पालखी तळ विकास आराखड्यातर्गत चंद्रभागा नदीपात्रामध्ये विष्णूपद मंदिराजवळ बांधण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.

विष्णूपद बंधारा हा भीमा नदीवरील मौजे गोपाळपूर ता.पंढरपूर येथे असून तो मुंढेवाडी को. प. बंधाऱ्याच्या पाणीसाठ्यामध्ये बुडीत बंधारा आहे. सदर बंधाऱ्याची उंची २.०० मी. इतकी आहे. परंतू सद्य:स्थितीत १.०० मीटर उंचीपर्यंत पाणीसाठा करण्याइतकेच बर्गे सुस्थितीत आहेत. त्यामुळे सद्य:स्थितीत सदर बंधाऱ्यामध्ये भाविकांना स्नानासाठी १.०० मी. उंचीपर्यंत पाणीसाठा केला जातो. माहे मे - २०२५ मध्ये विष्णूपद को. प. बंधाऱ्यामध्ये १.०० मी. उंचीपर्यंत बर्गे बसविणेत आले होते व यावेळी मुंढेवाडी बंधाऱ्यातील पाणीसाठ्यामुळे बर्ग्यांच्या उंचीपेक्षा जास्त पाणीसाठा होता. (बुडीत बंधारा असल्यामुळे)
(३) हे खरे नाही.
(४) भीमा नदीच्या पंढरपूर खालील (D/S) बाजूकडील विष्णूपद बंधारा मुंढेवाडी बंधारा व वरील (U/S) बाजूस असलेल्या पंढरपूर व गुरसाळे बंधारा यामध्ये योग्य प्रमाणात पाणीसाठा करुन भाविकांना स्नानासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच विष्णूपद बंधाऱ्यामध्ये सन २०२५-२६ मध्ये पुरेसे पाणी अडविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आरटीई प्रवेशातील शुल्क प्रतिपूर्तीबाबत

**(२७) १५३९३ (१८-०८-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षणाचा हक्क कायदा (आरटीई), २००९ अंतर्गत वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राखीव २५ टक्के जागांवर पहिली ते आठवीपर्यंत मोफत शिक्षण देण्याची तरतूद असून देखील शाळांना शासनाकडून शुल्काची प्रतिपूर्ती केली जाते मात्र प्रतिपूर्ती वेळेवर मिळत नसल्याने महाराष्ट्र इंग्लिश स्कूल टीचर्स असोसिएशनने (मेस्टा) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आरटीई प्रवेशासाठी संपूर्ण शुल्क पालकांकडून वसूल केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून प्रतिपूर्ती न मिळाल्यामुळे काही शाळांनी पालकांना थेट शुल्क वसुलीच्या नोटिसा बजावल्या असून लातूर शहरातील काही नामांकित इंग्रजी शाळांनी पालकांवर दबाव आणले आहेत अशा शाळांवर कोणती कारवाई केली आहे,

(३) असल्यास, अनेक खाजगी शाळांनी आरटीई पोर्टलवर ट्यूशन व टर्म फीचे दर अद्याप नोंदविले नसल्यामुळे पारदर्शकतेचा अभाव निर्माण झाला असून शासनाने अशा शाळांवर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्य:स्थितीत आरटीई प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता यावी प्रतिपूर्तीची प्रकिया सुलभ व्हावी तसेच पालक व विद्यार्थ्यांचे अधिकार अबाधित राहून शाळांकडून नियमभंग रोखण्यासाठी तसेच मेस्टा व पालकसंघटनांकडून करण्यात आलेल्या तक्रारी व निवेदनांचे निराकरण करण्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (३०-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील तरतूदींनुसार शाळांमध्ये प्रवेशस्तरावर एकूण विद्यार्थी संख्येच्या २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेमध्ये पारदर्शकता यावी, याकरिता सन २०१६-१७ पासून ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये लातूर जिल्ह्यातील १८० पात्र शाळांनी नोंदणी केली असून इयत्ता १ लीमध्ये १८५८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. सदर प्रवेश प्रक्रियेतील प्रवेशित बालकांच्या शैक्षणिक खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रक्रिया सुलभ होण्याच्या दृष्टीने शाळांना आरटीई पोर्टलवर किंवा शाळेच्या वेबसाईटवर शाळेची फीस अपलोड केलेली आहे. शासनाकडून प्रतिपूर्ती न मिळाल्याने आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे पालक किंवा मेस्टा संघटनेची शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे फीस वसूल केलेबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) आरटीई प्रवेश प्रक्रियेत कालानुरूप सुधारणा करणे व प्रवेशाची प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने राबण्यासाठी सर्व समावेशक बाबींचा एकत्रित समावेश करून शासनास शिफारशी करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक २९.०१.२०२५ अन्वये आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. त्यानुषंगाने आरटीई प्रवेश प्रक्रियेमध्ये सुधारित नियम तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जलसंपदा विभागांतर्गत कार्यकारी अभियंता संवर्गाच्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीच्या पुनर्विलोकनाबाबत

**(२८) १५४५१ (१४-०८-२०२५). श्री.राजू कारेमोरे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागांतर्गत कार्यकारी अभियंता संवर्गाच्या अधिकाऱ्यांचे सन १९७० ते १९९५ या कालावधीतील पदोन्नतीचे पुनर्विलोकन शासन अधिसूचनेच्या दिनांक ७ एप्रिल, १९८३ चे नियम ४ (२) नुसार करून निवडसूच्या सुधारित केल्याचा गोषवारा दिनांक २६ एप्रिल, २०१२ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार प्रसिद्ध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००१ ते २०१८ या कालावधीतील कार्यकारी अभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांचे पदोन्नतीचे पुनर्विलोकन शासन निर्णय दिनांक १९ डिसेंबर, १९७० चे नियम २७ नुसार करून निवडसूच्या सन २०२३ मध्ये सुधारित करण्यात आल्या हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणाच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्याची कारणे काय आहेत व त्याबाबतची

शासनाची भुमिका काय आहे,
(४) असल्यास, जलसंपदा विभागाअंतर्गत कार्यकारी अभियंता पदावरील पदोन्नतीच्या सन १९७० रोजीच्या नियमातील नियम २७ हा नियम ३३ प्रमाणे असंविधानिक असल्याचे निरीक्षण मा. सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या संविधान खंडपीठाने दिनांक २ मे,१९९० चे आदेशातील परिच्छेद १६ मध्ये नोंदविले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कार्यकारी अभियंता संवर्गाचे २००१ ते २०१८ या कालावधीतील पदोन्नत्यांचे पुनर्विलोकन व पुन: समायोजन नियम २७ नुसार करण्याची कारणे काय आहेत,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३०-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

मा.न्यायाधिकरणाचा दिनांक २७/०४/२००० रोजीचा आदेश व त्यास अनुसरून मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २७/०१/२००५ रोजीच्या निर्णयान्वये कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातील दिनांक २१/१२/१९७० ते दिनांक ३१/०३/१९९४ या कालावधीतील सेवाज्येष्ठता याद्या सुधारीत करून त्या दिनांक २८/०९/२००७ रोजीच्या परिपत्रकान्वये अंतिम करण्यात आल्या आहेत. त्याकरिता सदर कालावधीतील उप अभियंता या गोठीत संवर्गासाठी व सहायक कार्यकारी अभियंता या संवर्गासाठी उपलब्ध झालेली वर्षनिहाय पदे विहित केलेल्या कोट्यानुसार ६०:४० या प्रमाणात निश्चित करण्यात आली होती. सदर पदांचा तपशिल/गोषवारा (परिशिष्ट-ब) दिनांक २६/०४/२०१२ रोजीच्या परिपत्रकासोबत प्रसिध्द केला आहे. तसेच सदर परिपत्रकान्वये दिनांक ०१/०४/१९९५ ते ३१/१२/२००० या कालावधीतील पदोन्नतीचे पुनर्विलोकन करून तात्पुरती ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्यात आली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावरील पदोन्नतीची कार्यवाही दिनांक १९/१२/१९७० च्या सेवाप्रवेश नियमांनुसार सहायक कार्यकारी अभियंता, सहायक अभियंता श्रेणी-१, उप विभागीय अभियंता व उप विभागीय अधिकारी या निम्न संवर्गाकरिता अनुक्रमे निश्चित केलेल्या ४०:२५:२५:१० या कोट्यानुसार करण्यात येते. तथापि, सेवाज्येष्ठता मात्र दिनांक ०७/०४/१९८३ च्या ज्येष्ठता नियमांनुसार निश्चित करण्यात येते.

सन २००१ ते २०१८ या कालावधीतील कार्यवाही ही प्रचलित नियम व न्यायालयीन आदेशांच्या अधीन राहूनच करण्यात आलेली आहे.
(३) सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०७/०३/१९९६ नुसार सेवाभरतीचे प्रमाण हे वर्षनिहाय रिक्त पदांना लागू न करता संबंधित संवर्गाच्या एकूण मंजूर पदसंख्येला लागू करावयाचे आहे. म्हणून वर्षनिहाय रिक्त पदांवर कोटा लागू करणे आणि संवर्गसंख्येच्या एकूण मंजूर पदांवर कोटा लागू करणे या दोन पद्धतींमध्ये तत्त्वतः फरक आहे. त्यानुसार १९७० चे सेवाप्रवेश नियम, १९८३ चे ज्येष्ठता नियम, शासन निर्णय दिनांक ०७/०३/१९९६ तसेच मा. उच्च न्यायालय व मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचे निर्णय यांचा एकत्रित व सुसंगत अर्थ लावूनच पदोन्नती व सेवाज्येष्ठता निश्चित करण्याची शासनाची भूमिका आहे.
(४) नाही, हे खरे नाही
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विद्यार्थ्यांच्या नियतकालिक मूल्यांकन चाचणी (पॅट) परीक्षेमध्ये होणारे गैरप्रकार रोखण्याबाबत

**(२९) १५६०८ (२९-०१-२०२६). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण पद्धतीचे अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण (स्टार्स) या केंद्र सरकारपुरस्कृत प्रकल्पांतर्गत दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक मूल्यांकन चाचणी (पॅट) आयोजन केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इयत्ता दुसरी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची नियतकालिक मूल्यांकन चाचणी (पॅट) परीक्षेच्या पहिल्याच दिवशी गणित व इंग्रजी या दोन विषयांच्या प्रश्नपत्रिका दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान समाज माध्यमांवर प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच परिक्षेच्यावेळी पर्यवेक्षकांची कमतरता असल्याने सहावी व सातवीच्या वर्गातील परीक्षेची जबाबदारी शाळेतील शिपाई महिलांकडे सोपविण्यात आल्याचे दिनांक ७ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकारामुळे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून (एससीईआरटी) परीक्षेबाबत अंमलात येणाऱ्या काटेकोरपणा, मूल्यमापन व गुप्ततेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विद्यार्थ्यांची नियतकालिक मूल्यांकन चाचणी (पॅट) मध्ये होणारे गैरप्रकार रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०५-०३-२०२६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

दिनांक १० ते १३ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत संकलित चाचणी-१ (PAT-२) सुरु होताच तीन यूटयूब चॅनेलवर भाषा, गणित या विषयाचे चाचणी पत्रिका प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले. त्याअनुषंगाने विश्राम बाग पोलीस स्टेशन, पुणे शहर, पुणे येथे भारतीय न्याय संहिता (बीएनएस)-कलम २२३, भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३-कलम ३(५), महाराष्ट्र विद्यापीठच्या , मंडळाच्या व इतर विनिर्दीष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२-कलम ६ व माहिती तंत्रज्ञान अधिनियम २०००-कलम ७२ अन्वये संबंधित तीन यूटयूब चॅनेलवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) विद्यार्थ्यांची नियतकालिक मूल्यांकन चाचणी (पॅट) मध्ये होणारे गैरप्रकार रोखण्याकरीता चाचणी घेण्यापूर्वी सर्व जिल्हयांना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या कार्यालयाकडून लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी पात्र शिक्षकांना प्रमाणपत्र वितरीत करण्याबाबत**

**(३०) १५६४४ (२९-०१-२०२६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.तुकाराम काते (चेंबूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी आवश्यक प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले असूनही त्यांना प्रमाणपत्र मिळविण्यास विलंब झाला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांना अद्याप प्रमाणपत्र न मिळाल्याने ते वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव शिक्षण विभागाकडे पाठवू शकले नाहीत, त्यामुळे शिक्षकांचे मोठे नुकसान झाले असल्याची बाब समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित असलेल्या शिक्षकांची प्रमाणपत्र वितरणासाठीची प्रक्रिया कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे व अशा प्रकारचा होणारा विलंब टाळण्यासाठी कोणती यंत्रणा राबविण्यात येत आहे वा येणार आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित असलेल्या शिक्षकांची प्रमाणपत्र वितरणासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२८-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही

दिनांक ०२/०६/२०२५ ते १२/०६/२०२५ या कालावधीत प्रथम टप्यात झालेल्या प्रशिक्षणाचे वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी पात्र शिक्षकांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले आहेत.

(२) व (३) प्रथम टप्यात काही अपरिहार्य कारणामुळे प्रशिक्षणासाठी अनुपस्थित असलेल्या शिक्षकासाठी दिनांक २५/१०/२०२५ ते दिनांक ०३/११/२०२५ या कालावधीत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणातील वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी पात्र शिक्षकांना प्रमाणपत्र वाटपाची कार्यवाही संबधित जिल्हा व प्रशिक्षण संस्थेकडून सुरू आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इयत्ता पहिलीपासून विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकविण्याच्या अभ्यास करण्यासाठी समिती नियुक्ती केल्याबाबत**

**(३१) १६७१७ (२९-०१-२०२६). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.संजय देरकर (वणी), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.अभिजीत पाटील (माढा), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने इयत्ता पहिलीपासून विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकविण्याच्या सूत्राचा अभ्यास करण्यासाठी श्री.नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीची कार्यकक्षा काय आहे, समितीचे इतर सदस्य कोण आहेत व समिती किती कालावधीत अहवाल सदर करणार आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०७-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक ३० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील शाळांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने त्रिभाषा धोरण निश्चित करण्याकरिता शिक्षणतज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती.

या समितीमधील अन्य सदस्यांची नियुक्ती दिनांक ०५ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये व दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन शुध्दिपत्रकान्वये करण्यात आली होती. त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत गठित समितीची रचना खालीलप्रमाणे होती :-

१. डॉ. नरेंद्र जाधव, शिक्षणतज्ज्ञ (अध्यक्ष)
२. डॉ. सदानंद मोरे, माजी अध्यक्ष, भाषा सल्लागार (सदस्य)
३. डॉ. वामन केंद्रे , माजी संचालक, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (सदस्य)
४. डॉ. अपर्णा मॉरिस, शिक्षणतज्ज्ञ, पुणे (सदस्य)
५. डॉ. सोनल कुलकर्णी - जोशी, भाषा विज्ञान प्रमुख, डेक्कन कॉलेज, पुणे (सदस्य)
६. डॉ. मधुश्री सावजी, शिक्षणतज्ज्ञ, छत्रपती संभाजीनगर (सदस्य)
७. डॉ. भूषण शुक्ल, बालमानसतज्ज्ञ, पुणे (सदस्य)
८. श्री. संजय यादव, राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा अभियान, मुंबई (सदस्य सचिव)

शासन निर्णय दिनांक ०५ सप्टेंबर, २०२५ मध्ये समितीने दिनांक ३० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या कार्यकक्षेप्रमाणे कामकाज करावे व त्रिभाषा धोरणासंदर्भातील अहवाल तीन महिन्यांच्या मुदतीत शासनास सादर करावा, असे नमूद करण्यात आलेले आहे. परंतु, समितीच्या कामकाजाची व्याप्ती लक्षात घेता, दिनांक १५ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये त्रिभाषा धोरण समितीस ५ डिसेंबर, २०२५ ते ४ जानेवारी, २०२६ या कालावधीकरिता एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच, दिनांक ०५ जानेवारी, २०२६ पासून एक महिन्याची मुदतवाढ दिनांक २२ जानेवारी, २०२६ रोजी च्या शासन निर्णयान्वये देण्यात होती.

(३) डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीने दिनांक ०४.०२.२०२६ रोजी आपला अहवाल शासनास सादर केला आहे.

सदर समितीने सादर केलेल्या अहवालास मा. मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येणार असून, मा.मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंत्र्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करण्यास आढावा समिती गठीत करणेबाबत

**(३२) १६९३० (२९-०१-२०२६). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **संसदीय कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंत्र्यांनी दिलेली आश्वासनेअपूर्ण न ठेवता ती ९० दिवसांत पूर्ण करण्यात यावीत यासाठी शासनाने प्रत्येक विभागात सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक आढावा समिती गठीत करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने समित्या गठीत करण्यात आल्या आहेत काय,
(३) असल्यास, समित्या गठीत करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१६-०४-२०२६) :** (१), (२) व (३) संसदीय कार्य विभागाचे शासन परिपत्रक क्र. विपआ-२०२३/प्र.क्र.४२/चार, दिनांक १०/१०/२०२५ अन्वये, मंत्रालयीन विभागांच्या सचिवांनी विभागात प्रलंबित असलेल्या आश्वासनांची व अन्य संसदीय आयुधांची पुर्तता करण्याकरीता सचिवांचे अध्यक्षतेखाली विभागाचे समन्वय अधिकारी तसेच विभागातील अन्य सह सचिव / उप सचिव व जबाबदार अधिकारी यांची कायमस्वरूपी समिती गठीत करण्याबाबत" सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सर्व मंत्रालयीन विभागांनी सचिवांच्या अध्यक्षतेखाली कायमस्वरूपी समिती गठीत केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील युवक व प्रशिक्षणार्थ्यांसाठी सुरू करण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री अल्प मुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रमासाठी विशेष मोहीम राबविण्याबाबत

**(३३) १६९९७ (१७-०२-२०२६). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.तुकाराम काते (चेंबूर) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील युवकांना उद्योगांच्या गरजेनुसार त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री अल्प मुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ४१९ आयटीआयआय व १४१ शासकीय तंत्र विद्यालयात अडीच हजार तुकड्यांमधून एकूण ७५ हजार प्रशिक्षणार्थीना उद्योगाभिमुख व अल्पकालीन प्रशिक्षण दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण व दुर्गम भागातील युवकांना या योजनेची माहिती मिळावी आणि प्रवेश प्रक्रियेसाठी त्यांना सहाय्य मिळावे यासाठी शासनामार्फत विशेष मोहीम राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०७-०४-२०२६) :** (१) खरे आहे.
(२) व (३) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थां तसेच तांत्रिक विद्यालयांमध्ये अल्प कालावधीचे अभ्यासक्रम सुरु करण्याचे उद्घाटन मा. पंतप्रधान महोदय व मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थितीत दिनांक ८.१०.२०२५ रोजी करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीमध्ये राज्यातील ४१४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व १२२ शासकीय तांत्रिक विद्यालयांमध्ये एकूण १७६६ अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडया सुरु आहेत. यामध्ये एकूण ५१०४२ इतक्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

सदरहू अभ्यासक्रमांची माहिती ग्रामीण व दुर्गम भागातील युवक व जनसामान्यांपर्यंत पोहचावी यासाठी राज्यातील सर्वाधिक खपाच्या मराठी वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. तसेच सदरहू अभ्यासक्रमाची माहिती राज्यातील प्रत्येक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या परिसरामध्ये मोठा डिजीटल स्क्रीन लावून त्यावर लाईव्ह स्ट्रीमिंग दाखविण्यात आलेले आहे. तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण

संचालनालयामार्फत सदरहू अभ्यासक्रमाची माहिती संबंधित जिल्हाधिकारी कार्यालये, जिल्हापरिषदा व इतर सर्वसंबंधित विभागांकडून जनसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षणात पुढील शैक्षणिक वर्षांपासून कृषी अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात येत असल्याबाबत

**(३४) १६९९८ (२९-०१-२०२६). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यार्थ्यांना शेती, पर्यावरण आणि ग्रामीण विकास क्षेत्रासाठी जोडण्यासाठी तसेच त्यांच्यात कृषीविषयक कौशल्य वाढविण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षणात कृषी अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय शासनामार्फत माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षापासून इयत्ता सहावीपासून करण्यात येणार असून, टप्प्या-टप्प्याने दहावीपर्यंत या विषयाचा समावेश करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना शेतीतील तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर आणि कृषी पर्यटनाच्या व्यावसायिक संधी यांची ओळख करून देण्यासाठी उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत काय,
(४) असल्यास, या नवीन कृषी अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक अभ्यासक्रम आराखडा, शिक्षक प्रशिक्षण आणि पायाभूत सुविधा उभारणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०७-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार इयत्ता तिसरी ते इयत्ता दहावी चा शालेय अभ्यासक्रम निर्मिती करताना व्यवसाय शिक्षण विषयाच्या समिती समोर कृषी विषयाचा अभ्यासक्रम ठेवण्यात आला आहे. कृषी विषयक अभ्यासक्रमाची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षात टप्प्या-टप्प्याने करण्यात येणार आहे.
(३) व (४) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२३, व राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार कृषी विषय घटकांचा समावेश शालेय शिक्षण अभ्यासक्रमातील इयत्ता ३ री ते ५ वी या स्तरासाठी कार्यशिक्षण विषयात, ६ वी ते १० वी या स्तरासाठी व्यवसाय शिक्षण विषयांतर्गत करण्यात आला आहे. सदर अभ्यासक्रम मंजुरीसाठी सुकाणू समितीसमोर ठेवण्यात आला आहे.

इयत्ता ३ री ते ५ वी या स्तरासाठी कार्यशिक्षण या विषयांतर्गत इयत्ता ३ री साठी परसबागेतील कार्य, पशुपक्ष्यांशी निगडित व्यवसाय, इयत्ता ४ थी साठी स्थानिक पिके व परसबाग, व शेतीपूरक व्यवसाय, इयत्ता ५ वी साठी परिसरातील शेती व शेतीपूरक व्यवसाय, शेतीपूरक व्यवसायाचे प्रकार या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच इयत्ता ६ वी साठी शालेय परसबाग व जैवविविधता, इयत्ता ७ वी साठी अधिवास उद्यान व शालेय रोपवाटिका संगोपन, इयत्ता ८ वी साठी सेंद्रिय शेती व पाळीव प्राण्यांचे पोषण (खाद्य) व काळजी, इयत्ता ९ वी साठी तृणधान्य उत्पादन व बागकाम तसेच इयत्ता १० वी साठी संरक्षित शेती तंत्रज्ञान व कुक्कुट पालन या

घटकांचा समावेश करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध स्वायत्त महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या घडयाळी तत्वावरील (सीएचबी) प्राध्यापकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(३५) १७०२८ (२९-०१-२०२६). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध स्वायत्त महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या घडयाळी तत्वावरील (सीएचबी) प्राध्यापकांचे गेल्या अनेक महिन्यांपासून मानधन/वेतन प्रलंबित असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राध्यापकांनी वेतनाच्या विलंबाबाबत शासन व विद्यापीठांकडे अनेकदा निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवदेनाच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह प्राध्यापकांना प्रलंबित वेतन अदा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१८-०३-२०२६) :** (१) खरे नाही.
(२) खरे नाही.
(३) सद्य:स्थितीत स्वायत्त महाविद्यालयामध्ये कार्यरत तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन प्रलंबित नाही.

उच्च शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/(१८५/१८)/मशि-३, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ मध्ये तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नेमणूक व मानधन अदायगी बाबत अटी व शर्ती विशद करण्यात आलेल्या आहेत. तसेच उच्च शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशि-१,दिनांक १७/१०/२०२२ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांची नेमणूक, विद्यापीठ मान्यता, दरमहा मानधन अदायगी याबाबत सुसुत्रता आणून कार्यपध्दती निश्चित केलेली आहे.

शासन निर्णय दिनांक २७/०३/२०२३ अन्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अभ्यांगत / तासिका तत्त्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे सुधारीत दर दिनांक ०१/०४/२०२३ पासून लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यातील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित स्वायत्त महाविद्यालयांतील तासिका तत्त्वावर कार्यरत अध्यापकांना दरमहा मानधन अदा करण्याची कार्यवाही संबंधीत विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांच्याकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समाविष्ट करणेबाबत

**(३६) १७१०५ (२९-०१-२०२६). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प (NCLP) अंतर्गत महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांमध्ये बालकामगारांच्या विशेष शाळा (STC) मागील २० ते २५ वर्षांपासून कार्यरत होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी श्रम मंत्रालय, भारत सरकारच्या पत्र क्रमांक १६०२५/०४/२०२१-CL नुसार राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाचा समावेश समग्र शिक्षा अभियानात (SSA) करण्यात आल्याने दिनांक ३० मार्च, २०२२ पासून STC प्रकल्पामधील कर्मचारी बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पांतर्गत कार्यरत सुमारे १२०० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी शासनाला सेवा पुरवत असताना त्यांची सेवा समाप्त नकरता समग्र शिक्षा अभियान मध्ये विलीन करून शासन सेवेत समाविष्ट करणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१०-०४-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प (NCLP) राज्यातील बालमजुरीचे प्रमाण जास्त असलेल्या जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

(२), (३) व (४) भारत सरकारच्या श्रम एवं रोजगार मंत्रालय यांच्या दिनांक १४/०३/२०२२ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांनुसार, राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प (NCLP) सेंटर समग्र शिक्षा योजनेंतर्गत समाविष्ट करणेसंदर्भात भारत सरकार, शिक्षा मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १७/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व राज्यांना कळविले आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयाच्या स्तरावरून सर्व महानगरपालिका /नगरपालिका /नगरपरिषद/ जिल्हा परिषद यांना कळविण्यात आले आहे.

राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प (NCLP) संदर्भात केंद्र शासनाने दिनांक १७/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार दिनांक ३१/०३/२०२१ नंतर दाखल झालेल्या बालकांना समग्र शिक्षा योजनेच्या विशेष प्रशिक्षण केंद्रात प्रवेशित करण्यात यावे. सदर बालकामगार प्रकल्प (NCLP) अंतर्गत असलेले मनुष्यबळ समग्र शिक्षा अंतर्गत समाविष्ट करता येणार नाही, असे नमूद असल्याने राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा समावेश केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा अभियानात करणे, ही बाब राज्य शासनाच्या स्तरावरून करणे उचित ठरणार नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ३२ हजारांहून अधिक गावांमध्ये ग्रंथालये नसल्याबाबत

**(३७) १७१२७ (२९-०१-२०२६). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये वाचन प्रचारासाठी विविध सप्ताह आणि दिन साजरे केले जात असतांना दुसरीकडे राज्यातील ३२ हजारांहून अधिक गावांमध्ये ग्रंथालये नसल्याचे नुकतेच माहितीच्या अधिकारातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या तीन वर्षामध्ये ९९३ ग्रंथालयांची मान्यता रद्द करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात वाचन महोत्सव करण्यासोबतच ग्रंथालय चळवळीला चालना देऊन "गाव तिथे ग्रंथालय" सुरु करण्याकरिता शासनाची भूमिका काय आहे,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून ग्रंथालये सुरु करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा

करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०५-०३-२०२६) :** (१) दिनांक ३१/०३/२०२५ अखेर ग्रामीण व शहरी भागात मिळून ११९५५ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत.
(२) हे खरे आहे,

सन २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षात (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री अनुदाने यासाठी मान्यता) नियम, १९७० मधील निकषांची/अटींची पूर्तता न करणाऱ्या अकार्यक्षम ९९३ सार्वजनिक ग्रंथालयांची शासनमान्यता रद्द करण्यात आली आहे.
(३) व (४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक २२/०३/२०१३ आणि शासन निर्णय दिनांक ०७/०६/२०१४ अन्वये नवीन सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता देण्याची प्रक्रिया सन २०१२-१३ पासून स्थगित आहे.

गाव तिथे ग्रंथालय' ही सर्वसाधारण संकल्पना आहे. सन २०१२-१३ ते २०२४-२५ या कालावधीमध्ये १७०६ अकार्यक्षम शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची शासनमान्यता रद्द करण्यात आली आहे. शासनमान्यता रद्द करण्यात आलेल्या सदर १७०६ ग्रंथालयांऐवजी नवीन व्यवस्थापनांच्या अन्य ग्रंथालयांना शासनमान्यता देण्याचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) गडनदी धरण प्रकल्पांतर्गत पाणी पुरवठा कार्यन्वित करणेबाबत

**(३८) १७४३१ (१७-०२-२०२६). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) गडनदी धरण प्रकल्प अनेक वर्षांपूर्वी पूर्णत्वास गेला असूनही लगतच्या गावांमध्ये अजूनही पाण्याचा पुरवठा झाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडनदी धरणातून पाणीपुरवठा करण्यासाठी पाईपलाईन आणि इतर आवश्यक असलेल्या यंत्रणांचे काम पूर्ण झाले आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पासाठी आतापर्यंत किती खर्च झाला आहे, आणखी किती निधीची आवश्यकता आहे, तसेच, निधी अभावी काम रखडले आहे काय,
(४) असल्यास, गडनदी धरणातून पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी व जनतेला नियमित व पुरेसा पाणी पुरवठा होणेबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-०३-२०२६) :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

सन २००९-१० मध्ये धरणाची घळभरणी पूर्ण झालेली आहे. प्रकल्पांतर्गत मुख्य खुलाचर कालवे व बंदिस्त नलिका वितरण प्रणालीची मुख्य वाहिनीची कामे पूर्ण झालेली आहेत. तथापि, लाभक्षेत्र विकासाची कामे प्रगतीपथावर आहे. त्यामुळे लाभक्षेत्रात सिंचनासाठी पाणी सोडता आलेले नाही.
(२) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत प्रकल्पाच्या मुख्य खुलाचर कालव्याची कामे डिसेंबर, २०२४ मध्ये पूर्ण झाली असून बंदिस्त नलिका वितरण प्रणालीची कामे ९५ टक्के पूर्ण झाली आहेत. लाभक्षेत्र विकासाची कामे प्रगतीत असून उर्वरीत कामे जून, २०२६ अखेर पूर्ण करणेचे नियोजन आहे

(३) गडनदी मध्यम पाटबंधारे प्रकल्पावर माहे फेब्रुवारी, २०२६ अखेर रु.९४८.७९ कोटी इतका खर्च झालेला आहे. उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी रु. २१४.६१ कोटी निधीची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत या प्रकल्पाचा पाचवा सुप्रमा रु.११६३.४० कोटी किमतीचा प्रस्तावास मंजूरी देण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) नियमित व पुरेसा पाणी पुरवठा सुरू करण्यासाठी लाभक्षेत्र विकासाची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच प्रकल्पाच्या खुलाचर कालव्याला अस्तरीकरण करणे या कामाचा सुप्रमा प्रस्तावात अंतर्भूत करणेत आला असून, उर्वरीत कामे सुप्रमाच्या मान्यतेनंतर हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य, विद्युत आणि यांत्रिकी) गट-ब ची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३९) १७६६५ (१७-०२-२०२६). श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता, गट- ब (स्थापत्य, विद्युत आणि यांत्रिकी) मधील एकूण १६७२ पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पदे रिक्त असल्याने जलसंपदा विभागातील कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१८-०३-२०२६) :** (१) होय, अशंत: खरे आहे.
(२) व (३) सेवा प्रवेश नियम सुधारित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सुधारित सेवा प्रवेश नियमानुसार वित्त विभागाच्या मान्यतेने पदभरतीबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती, अचलपूर, यवतमाळ, मूर्तिजापूर, वाशिम आणि खामगाव येथील शासकीय तंत्रनिकेतन इमारतींची बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(४०) १७८०६ (२९-०१-२०२६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती, अचलपूर, यवतमाळ, मूर्तिजापूर, वाशिम आणि खामगाव येथील शासकीय तंत्रनिकेतन इमारतींची बांधकाम अपूर्ण असल्याचे दिनांक २४ जुलै, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामे एक वर्ष होवूनही अपूर्ण असून यवतमाळ व खामगाव येथील इमारतीची बांधकामे ९ महीने झाले तरी २५ टक्के ही झाली नसल्याने शैक्षणिक कामकाजावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या शासकीय तंत्रनिकेतन इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२५-०२-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

अमरावती विभागातील शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती, अचलपूर, यवतमाळ, मूर्तिजापूर, वाशिम आणि खामगाव या संस्थांचे आवश्यक दुरुस्ती व तत्सम कामे करुन फ़ेसलिफ़्टींग करण्याचे प्रगतीपथावर असुन यवतमाळ व खामगाव या दोन्ही संस्थांची, जवळपास ८० टक्के कामे पूर्ण झालेली आहेत.

सदर कामे, शैक्षणिक कामकाज सांभाळून सुरु असुन, शैक्षणिक कामकाज सांभाळून, कामाकरिता इमारत/ खोल्या उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. तथापि, सदर कामांमुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम झाला असल्याचे आढळून आले नाही.

(३) अमरावती, सार्वजनिक बांधकाम विभागातील ६ कामांच्या एकुण रु.४१५६.१० लक्ष रकमेच्या प्रशासकीय मान्यतेस अनुसरुन, आजतागायत रु.३३४८.१८ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. यापैकी शासकीय तंत्रनिकेतन खामगाव करीता रु.८९३.८८ लक्ष प्रशासकीय मान्यता असून आजतागायत रु.७१६.८८ लक्ष निधी वितरीत केलेला आहे. शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ करीता रु.७०८.१५ लक्ष प्रशासकीय मान्यता असुन आजतागायत रु.५६५.१५ लक्ष निधी वितरीत केलेला आहे.

बांधकामाची प्रगती समाधानकारक नसल्याने, संचालनालयाच्या दिनांक २२/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये, मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, अमरावती यांना, सदर कामे आवश्यक गती राखुन करणेबाबत कळविले आहे. सदर कामांची गुणवत्ता व्ही. जे.टी. आय, मुंबई या संस्थेद्वारे तपासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले पुरस्कार देण्याबाबत

**(४१) १७८१७ (२९-०१-२०२६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी शिक्षक दिनी क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले राज्यशिक्षक गुणगौरव पुरस्काराने गौरविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मध्ये उत्कृष्ट काम केलेल्या शिक्षकांकडून क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले गुणगौरव पुरस्कारासाठीच्या प्रक्रीयेचे वेळापत्रक १७ जुलै रोजी जाहीर करण्यात आले असून, १८ ते ३१ जुलै दरम्यान ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले, अर्जदार शिक्षकांच्या १६ ते १८ ऑगस्ट दरम्यान मुलाखती घेण्यात आल्या, या मुलाखती मधून निवड झालेल्या शिक्षकांची यादी १ सप्टेंबर, रोजी जाहीर करणे अपेक्षित असताना अद्याप शिक्षण संचालयाकडून यादी जाहीर झाली नसल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवड झालेल्या उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन म्हणून लवकर पुरस्कार मिळण्याकरिता शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१७-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक पुरस्काराचे वितरण दरवर्षी साधारणपणे शिक्षक दिनी ५ सप्टेंबर रोजी करण्यात येते. यावर्षी प्रशासकीय कारणास्तव सदरचे पुरस्कार हे दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी जाहीर होऊन पुरस्कार वितरण सोहळा हा दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ रोजी पार पडला.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अचलपूर व चांदूरबाजार जिल्हा अमरावती सिंचन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत

**(४२) १७८२८ (१७-०२-२०२६). श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.प्रविण तायडे (अचलपूर) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यातील (जि.अमरावती) सुरू असलेले सिंचन प्रकल्प अजून पर्यंत पूर्णत्वास गेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्प पूर्णत्वास गेले नसल्यामुळे तेथील शेतकरी सिंचनाच्या व पिण्याच्या पाण्याच्या सोयींपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजनापूर्णा बॅरेज सिंचन प्रकल्प, वासनी प्रकल्प, राजुरा प्रकल्प हे अजूनपर्यंत अपूर्ण आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकल्प पूर्ण होणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

अचलपूर व चांदुरबाजार तालुक्यांमधील ४ मध्यम व २ लघु पाटबंधारे प्रकल्पांची कामे पूर्ण झाली आहेत. तसेच २ मध्यम व २ लघु पाटबंधारे प्रकल्पांची कामे प्रगतीत आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

अचलपूर व चांदुरबाजार तालुक्यांतील पूर्ण झालेल्या प्रकल्पांतर्गत ३५,३२५ हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) वासनी मध्यम प्रकल्पांतर्गत धरणाचे काम ८० टक्के पूर्ण झाले असून लाभक्षेत्रातील बंद नलिका वितरण प्रणालीची (PDN) कामे प्रगतीपथावर आहेत. बोर्डीनाला मध्यम प्रकल्पांतर्गत १०० टक्के पाणीसाठा निर्माण झाला असून सिंचन क्षमता निर्मितीची कामे सुरु आहेत. राजना बॅरेज प्रकल्पाचा प्रथम सु.प्र.मा. प्रस्ताव क्षेत्रियस्तरावर प्रगतीत असून मंजुरीनंतर प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यात येईल. राजुरा बृ.ल.पा. धरणाचे काम ६० टक्के व बंद नलिका वितरण प्रणाली (PDN) चे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोव्हीड १९ विषाणूसंसर्गाच्या कालावधीत कर्तव्य बजावत असताना कोव्हीड विषाणूची लागण होऊन मयत झालेल्या शिक्षकांच्या वारसास विमा कवच सानुग्रह अनुदान मंजुरीबाबत

**(४३) १८३५७ (२९-०१-२०२६). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोव्हीड १९ विषाणूसंसर्गाच्या कालावधीत कर्तव्य बजावत असताना कोव्हीड विषाणूची लागण होऊन मयत झालेल्या शिक्षकांच्या वारसांना त्यांनी रीतसर सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी देऊन त्यांना विमा कवच लागू करुन सानुग्रह अनुदान मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मयत शिक्षकांच्या वारसास विमा कवच सानुग्रह अनुदान मंजुरीबाबत तपासून कार्यवाही करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदय यांनी प्रधान सचिव, शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांना दिलेले आहेत, हे

ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विमा कवच सानुग्रह अनुदान मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०५-०२-२०२६) :** (१) व (२) अशा प्रकारची व या आशयाची निवेदने प्राप्त होत आहेत.
(३) कोव्हिड-१९ संबंधित कर्तव्य बजावताना कोव्हिडमुळे मृत्यू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य लागू करण्याबाबत वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २९ मे, २०२० मधील तरतूदींनुसार कार्यवाही करण्यात येत असून मान्यतेनंतर शिक्षकांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५० लक्ष रुपये सानुग्रह सहाय्य प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शालेय विद्यार्थ्यांना चामड्याचे बूट हानिकारक असणे बाबत

**(४४) १८३६० (२९-०१-२०२६). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि.बुलढाणा) येथे बहुतांश शालेय विद्यार्थी हे चामड्याचे बूट वापरतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे बूट प्राण्याच्या चामड्यापासून बनवले जातात त्यामध्ये अत्यंत विषारी रसायनांचा वापर केला जातो जो मानवी त्वचेला हानी पोहचवतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चामड्याला पर्याय म्हणून कापूस लिनेन, जूट क्यानवास, या सारख्या वस्तू पासून बनवलेले बूट वापरू शकतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२५-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) समग्र शिक्षा अंतर्गत चिखली तालुक्यातील जिल्हा परिषद व नगरपरिषद व्यवस्थापनाच्या १६८ शाळांमधून १ ली ते ८ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या १७२९३ विद्यार्थ्यांकरीता बुट व पायमोजे खरेदी करण्यासाठी प्रति विद्यार्थी रु.१७०/- याप्रमाणे एकूण रु.२९,३९,८१०/- इतका निधी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यानुसार चिखली पंचायत समितीने १७२९३ विद्यार्थ्यांसाठी बुट व पायमोजे (एक जोडी बुट व दोन पायमोजे) शाळा व्यवस्थापन समिती मार्फत स्थानिक पातळीवर खरेदी करुन वितरित केले आहेत.
त्यामध्ये एकाही विद्यार्थ्यांला चामड्याचे बुटाचे वितरण करण्यात आले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इतवारा मस्जिद, उमरेड (ता. उमरेड, जि.नागपूर) या संस्थेची निवडणूक घेणेबाबत

**(४५) १८८०२ (२०-०२-२०२६). श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इतवारा मस्जिद, उमरेड (ता.उमरेड, जि.नागपूर) ही नोंदणीकृत संस्था असून या संस्थेची शेवटची निवडणूक २००७ या वर्षी झाली असून ज्याचा कार्यकाळ २०१२ ला संपला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२ पासून ते २०२५ पर्यंत एकदाही निवडणूक घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संस्थेची निवडणूक घ्यावी अशी मागणी व्यवस्थापक मंडळाने जिल्हा वक्फ कार्यालय, नागपूर यांना दिनांक १० जुलै, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संस्थेची निवडणूक घेण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (०१-०४-२०२६) :** (१), (२) आणि (३) होय हे खरे आहे.
(४) इतवारा मस्जीद, उमरेड (मा.उमरेड, जि.नागपूर) या वक्फ संस्थेची निवडणूक घेण्याची जबाबदारी संबंधित वक्फ संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीची आहे. मात्र सदर संस्थेने अद्याप निवडणूक घेतली नसल्याचे निष्पन्न झाल्याने प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने वक्फ मंडळाने संबंधित वक्फ संस्थेच्या योजनेतील तरतूदीनुसार निवडणूकीसंदर्भात प्रस्ताव सादर करणेबाबत दिनांक २१/०८/२०२५ च्या पत्रान्वये जिल्हा वक्फ अधिकारी, नागपूर यांना सूचना दिल्या असून वक्फ संस्थेची निवडणूक घेण्याबाबत वक्फ मंडळामार्फत पुढील कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) रामराज, महाण परिसरात प्रस्तावित सांबरकुड मध्यम प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(४६) १९२०३ (१७-०२-२०२६). श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) रामराज, महाण परिसरात प्रस्तावित सांबरकुड मध्यम प्रकल्प दिनांक २८ सप्टेंबर, १९८२ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी भूसंपादन करताना अत्यल्प दर निश्चित करण्यात आला असल्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी त्यास तीव्र विरोध केला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकल्पग्रस्तांनी आपल्या जमिनीच्या मोबदल्यात चालू बाजारभावानुसार हेक्टरी रुपये दोन कोटी इतक्या रकमेची भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०३-२०२६) :** (१) होय, हे अशंत: खरे आहे .

सांबरकुंड मध्यम प्रकल्पास दिनांक २८ जुलै,१९८२ रोजी मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली असून, मुख्य धरणाचे काम अद्याप चालु नाही. परंतु सद्यस्थितीमध्ये भुसंपादन व पुनर्वसनाबाबतची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) होय, हे खरे आहे.

प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रासाठी एकूण १५३.३ हेक्टर खाजगी जमीन संपादन आवश्यक असून त्यापैकी १०३.८१ हे. जमिनीचा अंतिम निवाडा दिनांक १७/०९/२०११ रोजी भुसंपादन कायदा १८९४ नुसार जाहीर झाला आहे. परंतु शेतकऱ्यांनी सदरची रक्कम ही जुन्या भूसंपादन अधिनियम १८९४ नुसार असल्याने संबंधीत

खातेदारांनी मोबदला रक्कम स्विकारण्यास तीव्र विरोध केला व २०१३ च्या नवीन भुसंपादन कायद्यानुसार मोबदला मिळण्याची मागणी केली आहे.
(३) होय, हे खरे आहे
 प्रकल्पग्रस्तांनी आपल्या जमिनीच्या मोबदल्यात चालु बाजारभावानुसार हेक्टरी दोन कोटी रुपयांची भरपाई मिळण्याची मागणी दिनांक ०४/१२/२०२३ च्या निवेदनाद्वारे सांबरकुंड प्रकल्पग्रस्त समितीमार्फत केली आहे.
(४) नवीन भुसंपादन कायद्याप्रमाणे देय रक्कम महसूल विभागाकडून परीगणित करुन सानुग्रह अनुदान प्रस्ताव दिनांक ०३/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील शाहू मिलच्या जागेत NIFT (नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी) व NID (नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ डिझाईन) या दोन्ही संस्थांच्या शाखा सुरु करणेबाबत**

**(४७) १९५७९ (१७-०२-२०२६). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील शाहू मिलच्या जागेत NIFT (नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी) व NID (नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ डिझाईन) या दोन्ही संस्थांच्या शाखा सुरु करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही शाखा सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय सावकारे (३०-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
 कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील शाहू मिलच्या जागेत NIFT (नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी) व NID (नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ डिझाईन) या दोन्ही संस्थांच्या शाखा सुरु करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री यांना केली आहे.
(२) मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५ मार्च, २०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य विचारात घेऊन महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाच्या कोल्हापूर येथील श्री. शाहू छत्रपती मिलच्या जागेवर वस्त्रोद्योगासंबंधित बाबी निर्माण करण्यासाठी साधारणत: ५ एकर व मिलच्या आवारात राहणाऱ्या माजी अधिकाऱ्यांनी स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी सुमारे २००० चौ.मी. इतकी जागा सोडून उर्वरित जागेवर स्थानिक कारागिरांना बाजारपेठची उपलब्धता, रोजगार निर्मिती व तरुणांना आधुनिक वस्त्रोद्योगासंबंधित प्रशिक्षण या सर्व बाबींचा सांगोपांग विचार करुन राजर्षी शाहू महाराजांचे स्मारक उभारण्याकरीता कोल्हापूर महानगरपालिकेने प्रस्तावित स्मारकाचा आराखडा तयार करुन वस्त्रोद्योग महामंडळास सादर करावा असे निर्देश मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांनी दिले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईच्या नेहरू तारांगणाच्या धर्तीवर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे कृत्रिम नेहरू तारांगण इमारतीची निर्मिती करणे बाबत

**(४८) २०००२ (२९-०१-२०२६). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे मुंबईच्या नेहरू तारांगणच्या धर्तीवर कृत्रिम नेहरू तारांगण इमारत निर्मित करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना दिनांक १६ सप्टेबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थी नागरिक यांना खगोलशास्त्र व रात्रीच्या आकाश विषयी ज्ञान मिळण्यासाठी तसेच खगोलशास्त्र विषयी असणारे कुतुहल यासाठी व मनोरंजक कार्यक्रम इ.साठी नेहरू तारांगण उभारता यावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे मुंबईच्या नेहरु तारांगणच्या धर्तीवर कृत्रिम नेहरु तारांगण इमारत निर्मिती करण्यासाठी संबंधितांना निर्देश देण्याची विनंती सदर पत्रान्वये करण्यात आली होती. त्यानुसार कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ यांना दिनांक १६/०९/२०२५ रोजी सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात उर्दू घर, उर्दू शाळा व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे बांधण्याबाबत

**(४९) २०१५४ (२२-०२-२०२६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठी व उर्दू साहित्याची देवाण-घेवाणासाठी सांस्कृतिक केंद्र असलेली उर्दू घर बांधण्यात येणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्दू शाळा, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे वाढविणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्दू घर बांधण्याबाबत व उर्दू शाळा, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती सुनेत्रा पवार (०१-०४-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे. महाराष्ट्र राज्यात उर्दू भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी अल्पसंख्याक विकास विभागाच्या दिनांक ०६/०५/२०२२ च्या शासन निर्णयानुसार धोरण निश्चित करण्यात आले असून त्यानुसार राज्यात उर्दू घरे उभारण्यात येत आहेत.

(२) आणि (३) अल्पसंख्याक विकास विभागामामार्फत अल्पसंख्याक विद्यार्थी/विद्यार्थ्यानींसाठी शासकीय महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था अथवा विद्यापीठाच्या आवारामध्ये आतापर्यंत ३२ वसतीगृहे उभारण्यात आली आहेत. तीन वसतीगृहांचे काम सुरु असून एका वसतीगृहाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. प्राप्त होणाऱ्या मागणीनुसार जागेच्या उपलब्धतेनुसार शासनाकडून वसतीगृहे उभारण्याबाबत कार्यवाही करण्यात येते. तसेच दिनांक ०६/०५/२०२२ च्या धोरणानुसार राज्यात जागेच्या उपलब्धतेनुसार उर्दू घरे उभारण्यात येत असून आतापर्यंत राज्यात ४ उर्दू घरे उभारण्यात आली असून एक उर्दू घराचे बांधकाम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पायाभूत चाचणी परीक्षेमध्ये (PAT) गोपनीयता नसल्याबाबत

**(५०) २०४०४ (२९-०१-२०२६). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या शिक्षण विभागाकडून इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी पायाभूत चाचणी परीक्षा (PAT) घेण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परीक्षेच्या पेपरची कसलीही गोपनीयता न ठेवता व पेपर सील न करता शाळेत अगोदरच पाठवले जात असून उत्तर पत्रिकाही ऑनलाईन उपलब्ध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच हदगाव तालुक्यातील (जि.नांदेड) अनेक शाळांना अपुऱ्या पेपरचा पुरवठा करण्यात आला आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून विद्यार्थ्यांची गुणवत्ता टिकून ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०५-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

समग्र शिक्षा अंतर्गत नियतकालिक मूल्यांकन चाचणी (PAT) अंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांत इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

सदर चाचणी पत्रिकेचे पॅकबंद गठ्ठे बांधून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे या कार्यालयावरुन थेट गटशिक्षणाधिकारी/प्रशासनाधिकारी व तालुका समन्वयक यांच्या समक्ष केंद्र प्रमुख अथवा मुख्याध्यापकांमार्फत उपलब्ध करुन दिले जातात.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) नियतकालिक मूल्यांकन चाचणी (PAT) अंतर्गत पायाभूत चाचणी, मूल्यमापन चाचणी-१ व संकलित मूल्यमापन चाचणी-२ अशा तीन नियतकालिक चाचण्यांचे नियोजन करण्यात आले आहे. या चाचण्यांद्वारे विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती लक्षात घेऊन शिक्षकांनी गरजेनुरुप अध्ययन अध्यापन प्रक्रियेत मुलभूत सुधारणा करावयाची आहे व कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करावयाची आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.